# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२३**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**वसई ते बोर्डी (जि. पालघर) या गावांत मेरिटाईम बोर्डाने निकृष्ट दर्जाची कामे केल्याबाबत**

**(१) ३८२८४ (०७-०४-२०२२). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील वसई ते बोर्डी या ११० किलोमीटर दरम्यान सुमारे २८ मच्छिमारी गावांत मेरिटाईम बोर्डामार्फत कामे करण्यांत आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामे निकृष्ट दर्जाची असून अधिकाऱ्यांच्या संगनमताने सुरु असल्याची तक्रार तेथील नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय बनसोडे (२८-०७-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे. पालघर जिल्ह्यातील मच्छिमार गावात महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत केंद्र शासनाच्या सागरमाला योजनेअंतर्गत व राज्य स्तरीय योजनेअंतर्गत तसेच जिल्हा नियोजन समितीमार्फत सुचविण्यात आलेली सुमारे १४ कामे हाती घेण्यात आलेली आहेत.

सदर २८ मच्छिमारी गावांमध्ये महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डा व्यतिरिक्त सार्वजनिक बांधकाम विभाग, मत्स्यव्यवसाय विभाग इत्यादी विविध विभागाद्वारे काम करण्यात येते. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत १४ कामे हाती घेण्यात आली.

(२) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत झालेल्या कामां बाबत तसेच कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

कामाची गुणवत्ता/दर्जा चांगला राखण्याकरिता सदर कामांचे सर्वेक्षण, आराखडे तसेच संपूर्ण काम पूर्ण करून घेण्याच्या कार्यवाहीकरिता महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत तज्ञ सल्लगार नियुक्त करण्यात येतात. तसेच बोर्डाच्या अभियांत्रिकी शाखेमार्फतही कामांची देखरेख करण्यात येते.

सदर कामांची गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीने खालील कामांचे भारतीय प्रौद्योगिकी संस्थान मुंबई, पवई (I.I.T.) यांचेकडून थर्ड पार्टी ऑडिट करण्यात आले आहे.

१. नारंगी, ता.जि.पालघर येथे रो-रो जेट्टी बांधकाम करणे.

२. खारवाडेश्री, ता.वसई, जि.पालघर येथील जेट्टीला पोचरस्ता बांधकाम करणे.

३. वसई, ता.वसई, जि.पालघर येथे रो-रो जेट्टी बांधकाम करणे.

४. पांजू, ता.वसई, जि.पालघर येथे प्रवासी जेट्टी बांधकाम करणे.

५. अर्नाळा, ता.वसई, जि.पालघर येथे प्रवासी जेट्टी बांधकाम करणे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

वि.स. १९१ (2)

## उल्हासनगर (जि. ठाणे) मधील एस.आर.ए. योजना प्रलंबित असल्याबाबत

**(२) ४०४९० (१८-०४-२०२२). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर मध्ये प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत सन २०१५ मध्ये महानगरपालिकेने रवींद्र नगर व मुकुंद नगर येथील घरांचे सर्वक्षण करून ही योजना राबविली असून, शासनाकडे या योजनेचा प्रस्ताव गेल्या पाच वर्षांपासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घराचे बांधकामासाठी शासनाकडून किती निधी प्राप्त झाले आहे तसेच आतापर्यंत किती खर्च करण्यात आला आहे,

(३) असल्यास, मुकुंद नगर येथील जागेची मोजणी करण्याकरिता उल्हासनगर महानगरपालिकेने नगर भूमापन अधिकारी यांच्याकडे दिनांक २७ ऑक्टोबर, २०२० रोजी अर्ज दिला असून देखील भूमापन अधिकारी, उल्हासनगर यांनी सदर जागेची मोजणी पुर्ण केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगरपालिकेने दिनांक २० ऑगस्ट, २०२० रोजी सदर जागेवर मा.प्रधानमंत्री आवास योजनेला मंजुरी मिळण्याबाबत कळविण्यात येऊनही नगर भूमापन अधिकारी यांनी परस्पर जागेची सनद दिनांक १२ नोव्हेंबर, २०२० रोजी पोलीस विभागाला दिल्याचे निदर्शनास आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर पोलीस विभागाला देण्यात आलेली सनद रद्द करून मा.प्रधानमंत्री आवास योजनेची मोजणी करून देण्यांत यावी अशी मागणी महानगरपालिकेने दिनांक २० डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२७-०७-२०२३) :** (१) उल्हासनगर महानगरपालिकेने प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत अत्यल्प उत्पन्न गटासाठी मुकुंदनगर येथे ३८० घरकुले, संतोषनगर येथे ७१० व ३५१ अशा १०६१ घरकुलांचे दोन प्रकल्प असे एकूण ३ प्रकल्प अहवाल सादर केले होते.

तथापि, ३ ही प्रकल्पांची जागा उल्हासनगर महानगरपालिकेच्या ताब्यात नसल्याने सदर प्रकल्पांना मंजूरी देण्यात आली नाही.

(२) उल्हासनगर महानगरपालिके कडून प्राप्त तीनही प्रकल्पांना मंजूरी मिळाली नसल्यामुळे केंद्र व राज्य शासनाचा निधी वितरीत करण्यात आलेला नाही.

तथापि, उल्हासनगर महानगरपालिकेस "सर्वांसाठी घरे कृती आराखडा" (HFAP०A) अंतर्गत रु. ११.८१ लक्ष निधी दि. ३१ ऑगस्ट, २०२१ रोजी वितरीत केलेला आहे.

(३) होय.

(४) उपविभागीय अधिकारी कार्यालय, उल्हासनगर यांचेकडून मुकुंदनगर, उल्हासनगर जागेची मोजणी करून सदर जागेची सनद पोलिस आयुक्त, ठाणे यांना दिले असल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

(५) उल्हासनगर महानगरपालिके तर्फे संतोष नगरच्या जागेची मोजणी पूर्ण झाली असून सदर जागेचा ताबा उल्हासनगर महानगरपालिकेला देण्याची कार्यवाही उपविभागीय कार्यालयाच्या स्तरावर सुरू आहे.

तसेच मुकुंदनगर येथील जागेची पोलिस आयुक्त, ठाणे यांना देण्यात आलेली सनद रद्द करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिकेस दिनांक २०.१२.२०२१ रोजी नगर भूमापन अधिकारी यांनी पत्र दिले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील घरकुल बांधकामाचा कोट्यावधी रुपयाचा प्रलंबित निधी लाभ धारकांना मिळणेबाबत

**(३) ४१७९१ (०१-०४-२०२२). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील घरकुल बांधकामाचा कोट्यावधी रुपयांचा प्रलंबित निधी लाभ धारकांना तातडीने देण्यात यावा या मागणीसाठी कामठी तहसिल कार्यालयावर विविध गावातील ग्रामस्थांनी मोर्चा काढून निवेदन देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तसेच उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (२७-०७-२०२३) :** (१) होय.

(२) प्रधानमंत्री आवास योजना शहरी घटक क्र. ०४ अंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत एकूण २३ प्रकल्पांमधील २०,४६८ घरकुलांना मंजूरी देण्यात आली आहे.

सदर प्रकल्पांना केंद्र शासनाच्या हिश्श्यापोटी रुपये ३०७.०२ कोटी व राज्य शासनाच्या हिश्श्यापोटी रूपये २०४.६८ कोटी निधी आवश्यक आहे. माहे मे, २०२३ पर्यंत केंद्र शासनाच्या हिश्श्यापोटी रुपये १३१.६२ कोटी व राज्य शासनाच्या हिश्श्यापोटी रुपये २०१.६१ कोटी निधी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना वितरीत करण्यात आलेला आहे.

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणला सद्यस्थितीत रुपये ४६.९३ कोटी Credit Limit देण्यात आली असून, रुपये ३६.९३ कोटी खर्च झाला असून, रुपये १०.८० कोटी Credit Limit NMRDA कडे शिल्लक आहे.

(३) प्रश्न उद्धवत नाही.

---

## मुंबईत म्हाडाने खाजगी विकासक यांना वितरण केलेले संक्रमण शिबीरातील गाळेबाबत

**(४) ४७५८२ (२१-०९-२०२२). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाने मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील ३३(५) ३३(७) ३३(९) ३३(१०) अंतर्गत खाजगी विकासक यांना संक्रमण शिबीरातील गाळे वितरीत केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी विकासकांना सदर गाळे वितरण करताना ३ वर्षांकरिता भाडेतत्वावर दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २००१ ते सन २०२१ या कालावधीत खाजगी विकासकांना वितरित केलेल्या संक्रमण शिबीरातील गाळयांपैकी किती गाळे म्हाडा मंडळाकडे परत केले तसेच उर्वरित गाळयांची थकित भाडे रक्कम किती आहे,

(४) असल्यास, गाळे परत न केलेल्या खाजगी विकासकावर शासनने कार्यवाही केली तसेच थकीत भाडे देण्याबाबत निर्देश म्हाडाला दिले आहेत काय ?

**श्री. अतुल सावे (१६-०६-२०२३) :**(१) मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत एकूण ४२ खाजगी विकासकांना ४२१२ संक्रमण गाळे वितरीत करण्यात आले आहेत.

(२) विकासकांचा प्रकल्प पुनर्वसन पुर्ण होईपर्यंत किंवा जास्तीत जास्त ३ वर्षाच्या मुदतीपैकी जे कमी असेल त्या कालावधीकरीता संक्रमण गाळयाचे वितरण करण्यात येते. तथापी, विकासकाचा प्रकल्प विहीत कालावधित पूर्ण न झाल्याने सदरचे संक्रमण गाळे अद्याप विकासकाच्या ताब्यात आहेत. विकासकाने प्रकल्प पुर्ण न झाल्याने सदर संक्रमण गाळयाची मुदत वाढवून मिळणेबाबत मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाला विनंती केली आहे. त्यानुसार अशा विकासकाची विनंती मान्य करण्यात आली आहे.

(३) खाजगी विकासक यांना एकूण ४२१२ संक्रमण गाळे वितरीत करण्यात आले आहेत. त्यापैकी १४२९ संक्रमण गाळे मंडळास परत करण्यात आले असून सद्य:स्थितीत विकासकाकडे २७८३ एवढे गाळे ताब्यात आहेत. माहे एप्रिल २०१६ ते माहे ऑक्टोबर २०२२ या कालावधीत रू.१९१.२४ कोटी इतक्या रकमेची वसूली विकासकांकडून करण्यात आलेली असून माहे ऑक्टोबर २०२२ अखेरपर्यंत रु.१४०.८२ कोटी इतकी रक्कम विकासकांकडे थकित आहे.
(४) विकासक थकीत भाडे अदा करण्याबाबत अनियमीतता दिसून आल्याने विकासकांकडील संक्रमण गाळयापोटी थकीत भाड्याच्या वसूलीकरीता विकासकाविरूध्द लवाद (Arbitration) कायद्यामधील कलम ९ नुसार पिटिशन दाखल करण्याबाबत संबंधित पॅनल वकिल यांना म्हाडाकडून कळविण्यात आले आहे. त्यानुसार पॅनल वकिल यांमार्फत १२ विकासकंना नोटिस बजावण्यात आली आहे. त्यापैकी २ विकासका विरूध्द याचिका दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच, एकूण २२ थकबाकीदार विकासकांविरूध्द खेरवाडी पोलीस ठाणे येथे म्हाडाकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी काही विकासकांनी मा.उच्च न्यायालयामध्ये दावे दाखल केले असून सदर दावे मा.उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित आहेत.

विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) अंतर्गत थकबाकी अदा न करणाऱ्या एकूण २४ विकासक यांना काम थांबा नोटीस (Stop work notice) देण्यात आली आहे. तसेच एस.आर.ए. विकास नियंत्रण नियमावली ३३ (१०) अंतर्गत १२ विकासकांना संक्रमण गाळयापोटी थकीतभाडे भरणा करीत नाहीत तोपर्यंत इतर परवानग्या देण्यात येऊ नयेत व त्यापैकी ५ विकासक पुनर्विकास करीत असलेल्या प्रकल्पास काम थांबवा नोटीस देण्यात आली आहे.

---

## सिहोरा (जि.भंडारा) येथील सोडयाटोला सिंचन योजनेतील सौरऊर्जेवरील प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(५) ५२१०५ (१८-०१-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिहोरा (जि.भंडारा) येथील सोडयाटोला सिंचन योजनेतील सौरऊर्जेवरील प्रकल्प प्रलबिंत असल्याचे माहे, सप्टेंबर-२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील महत्वाकांक्षी प्रकल्प अपूर्ण असल्याची कारणे कोणती आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदरील महत्वाकांशी सौरऊर्जेवरील प्रकल्प उभारण्याबाबत कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०८-२०२३) :**(१) होय,

दि. १९ जुलै, २०१८ रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवन, नागपूर येथे भंडारा जिल्हयाच्या आढावा बैठकी दरम्यान सोंडयाटोला उपसा सिंचन योजना ता. तुमसर जि. भंडारा या प्रकल्पावरील पंप वापरतांना दिवसा सौरउर्जा आणि रात्रीच्या वेळी पारंपारिक विद्युत उर्जेचा वापर करण्याकरीता नियोजन करणेस्तव जलसंपदा विभागास निर्देश देण्यात आले आहेत.
(२) व (३) दि. ०४/०९/२०१८ रोजी मा. जलसंपदा मंत्री व मा. उर्जा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत झालेल्या आढावा बैठकीत सिंचन विकास महामंडळाकडील वापरात नसलेल्या अतिरिक्त जागेवर रु. १/- इतक्या नाममात्र दराने ३० वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपट्टी तत्वावर महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (MEDA) ला सौरउर्जा प्रकल्पाकरीता जागा उपलब्ध करुन देण्याचे ठरले आहे.

क्षेत्रिय स्तरावरुन २ हे. जागा महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (MEDA) नागपूर यांना हस्तांतरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्या अनुषंगाने सदर जागेच्या सिमांकनाची संयुक्त कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सिरसाडा (ता.पवनी, जि.भंडारा) येथे गुरांची चोरी करून विक्री केल्याबाबत

**(६) ५४६७६ (२४-०१-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिरसाडा (ता.पवनी, जि.भंडारा) येथील बळीराम गोमाता सेवाभावी संस्थेतून दाखल करण्यात आलेली ८९ जनावरे मृत झाल्याचे भासवून या जनावरांची विक्री करण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पशुवैद्यकांच्या मदतीने बनावट मृत्यू प्रमाणपत्र तयार करून शासनाची फसवणूक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०७-२०२३) :** (१) होय,
हे खरे आहे.

(२) होय,
हे खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी चौकशी करून संबंधीतांवर पो. स्टे. पवनी येथे भा.दं. वि. कलम ३४, ४०२, ४१७,४६७, ४६८ अन्वये गु.र. क्र. २७२/२०२२ नोंद करण्यात आला असुन सदर गुन्हयामध्ये एकूण १८ आरोपींना अटक करण्यात आली असुन, गुन्हयातील ०४ आरोपींनी मा. सत्र न्यायालय भंडारा यांचे कडून अटकपूर्व जामीन मंजुर केले असून फरार ०३ आरोपी यांचा शोध घेऊन गुन्हयात अटक करून आरोपींविरुध्द साक्ष पुरावा गोळा करुन मा. न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दाभोळ खाडी ते पेढे (गोवळकोट) या नवीन राष्ट्रीय जलमार्गची केलेली घोषणा

**(७) ५४९८८ (२४-०१-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्री.यशवंत माने (मोहोळ) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दाभोळ खाडी ते पेढे (गोवळकोट) या नवीन राष्ट्रीय जलमार्गची घोषणा करुन केंद्र सरकारच्या बंदरे आणि जलवाहतूक मंत्रालयाने २०१६ साली ७ व्या समुहांतर्गत येणाऱ्या राष्ट्रीय जलमार्ग क्र. २८ (४५.२२८ कि.मी.) ला मंजूरी दिली. त्यानुसार लगेचच जलमार्ग विकसित करणे, अपेक्षित मालवाहतुकीसाठी पाण्याची खोली, मार्गाची रुंदी, प्रकल्पासाठी येणारा खर्च इ. बाबींचा अभ्यास करुन प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला. हा विस्तृत प्रकल्प अहवाल दि. ०५.०८.२०१९ रोजी Inland Waterway Authority of India (IWAI) यांना सादर करण्यात आला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्याच्या गोवळकोट बंदरानजिक पेढे गावाच्या किनाऱ्यावर रो रो सर्व्हिस रोल ऑन - रोल ऑफ आय टर्मिनल (बंदर) करण्याचे सुचविले आहे. यासाठी लागणाऱ्या जमिनीचा सर्व्हे ही २०१७ साली करण्यात आला. या जलमार्गाचा टोपोग्राफिकल सर्व्हे केला गेला आहे हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, अत्यंत कमी खर्चामध्ये हा ४५.२२८ कि.मी. चा राष्ट्रीय जलमार्ग विकसित होवू शकतो. या जलमार्गाच्या अखेरच्या टप्यात लोटे औद्योगिक वसाहत असल्याने या जलमार्गाने रो रो सर्व्हिसने वाहतूक करता येईल शिवाय आय. डब्ल्यू. टी. क्लास ४ व्हेसल प्रकारच्या जहाजातून न्हावा शेवा येथील जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट (JNPT) येथून थेट दाभोळ खाडीतून पेढे, (ता. चिपळूण) येथील नियोजित बंदरात वाहतूक होवू शकते हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, अगदी कमी आर्थिक गुंतवणुकीत जास्तीत जास्त फायद्याचा दाभोळ ते पेढे (गोवळकोट ) हा जलमार्ग कोकणासाठी अत्यंत किफायतदार ठरू शकणारा हा जलमार्ग होणेसाठी राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे कोणती कार्यवाही करण्यात आली अथवा येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (२२-०६-२०२३) :**क्र. (१), (२), (३), (४) व (५)

केंद्र शासनाच्या विधि व न्याय मंत्रालयाने दि. २५.३.२०१६ च्या राजपत्राव्दारे प्रसिध्द केलेल्या The National Waterways Act, २०१६ अन्वये देशातील राष्ट्रीय जलमार्ग घोषित केले आहेत. त्यामध्ये दाभोळ खाडी हा जलमार्ग क्र. २८ म्हणून समाविष्ट आहे.

उक्त कायद्यानुसार, राष्ट्रीय जलमार्गांचा विकास व नियमन ही जबाबदारी केंद्र शासनाच्या बंदरे, नौवहन व जलमार्ग मंत्रालयाच्या अधिपत्याखालील “भारतीय अंतर्देशिय जलमार्ग प्राधिकरण IWAI यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने, भारतीय अंतर्देशिय जलमार्ग प्राधिकरण यांनी दाभोळ खाडीकरिता मे. ट्रॅक्टाबेल इंजिनिअरिंग प्रा.लि. या सल्लागार संस्थेमार्फत विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करवून घेण्यात आला असून टोपोग्राफीक सर्वे सुद्धा करण्यात आला आहे. प्रकल्प अहवालाच्या सारांशानुसार ४५.२२८ किमी एवढ्या लांबीचा जलमार्ग दोन टप्प्यामध्ये प्रस्तावित करण्यात आला आहे. तसेच सदर जलमार्गाच्या टप्प्यात इंडस्ट्रियल बेल्ट असल्याने सुरुवातीच्या ३४ किमी पर्यंत पर्यंत रो-रो सर्व्हिसने वाहतूक करणे शक्य असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सदरची वाहतूक नॅशनल वॉटरवेच्या क्लास ४ व्हेसल प्रकारच्या जहाजाद्वारे सुरक्षितपणे होऊ शकते असेही निरिक्षण नोंदविण्यात आले आहे.

राष्ट्रीय जलमार्ग क्र. २८-दाभोळ खाडी मध्ये खाजगी विकासकाने सागरी/बंदर सुविधाविषयक प्रकल्प उभारण्यासाठी इच्छुकता दर्शविल्यास, त्यावर शासनाच्या प्रचलित बंदर विकास धोरणानुसार यथोचित कार्यवाही करण्यात येईल.

---

## वसई-विरार शहरातील बहुतांशी रोहित्रे (ट्रान्सफॉर्मर) यांना सुरक्षा कवच बसविण्याबाबत

**(८) ५६८१४ (३०-०४-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार शहरातील बहुतांशी रोहित्रे (ट्रान्सफॉर्मर) हे अत्यंत धोकादायक स्थितीत असल्याचे प्रहार जनशक्ती पक्षाच्या विरार येथील पदाधिकाऱ्याने दिनांक ४ फेब्रुवारी, २०२० रोजी एका सविस्तर लेखी निवेदनाद्वारे ऊर्जा मंत्री, मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं. मर्या, प्रकाशगड, वांद्रे यांच्या निदर्शनास आणून दिली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसई-विरार शहर विरार विभागाअंतर्गत महानगर प्रदेश प्रणाली सक्षमीकरण योजनेखाली वसई-विरार शहरातील धोकादायक अवस्थेत असलेल्या १४६ रोहित्रांच्या भोवती सुरक्षा कवच बसविण्याचा प्रस्ताव अधिक्षक अभियंता, वसई मंडळ यांनी दिनांक १० मार्च २०२२ रोजी व त्यासुमारास महावितरण कल्याण मंडळ याना सादर केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आलेल्या आणि प्रलंबित असलेल्या या प्रस्तावास तात्काळ मंजुरी देण्याची मागणी प्रहार जनशक्ती पक्षाच्या पालघर जिल्ह्याच्या वतीने दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ आणि त्यानंतर दिनांक ४ ऑक्टोबर, २०२२ रोजी मान उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री यांच्याकडे केली हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रलंबित प्रस्तावास मंजुरी देऊन वसई-विरार शहरातील धोकादायक रोहित्रांना सुरक्षा कवच बसविणेकामी शासनाने कोणत्या स्वरूपाची कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.
(४) वसई-विरार शहरातील धोकादायक ५४८ रोहित्रांना सुरक्षा कवच बसविण्यासाठी सन २०२३-२४ वर्षातील निधीच्या तरतूदीतून सदरील कामे पुर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मांडवा बंदरात साचलेल्या गाळामुळे प्रवासी जलवाहतूक करणाऱ्या वाहतूकदारांना व रो-रो सेवेचे नुकसान होत असल्याबाबत**

**(९) ५७०३५ (३०-०४-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांडवा बंदरात साचलेल्या गाळ काढण्यासाठी दरवर्षी कोट्यावधी रुपये खर्च केले जात असून देखील गाळामुळे प्रवासी जलवाहतूक करणाऱ्या वाहतूकदारांना व रो-रो सेवेचे ही नुकसान झाले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बारमाही जलवाहतुकीसाठी मान्सूनमधील समुद्राच्या लाटा थोपवण्यासाठी मांडवा बंदरात १३५ कोटी रुपये खर्च करून बांधलेला ब्रेक वॉटर बंधारा हा चुकीच्या ठिकाणी बांधल्याने पावसाळ्यात समुद्राच्या लाटांबरोबर येणारा गाळ बंधाऱ्यामुळे अडकतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या बंधाऱ्याचा अभ्यास करून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय बनसोडे (२८-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) नाही.

मांडवा येथील ब्रेक वॉटरचे बांधकाम करण्यासाठी CWPRS पुणे यांचेकडील काटछेद प्राप्त करून घेण्यात आले असून सदरच्या काटछेदानुसारच ब्रेक वॉटरचे काम करण्यात आलेले आहे. ब्रेक वॉटर बंधारा योग्य ठिकाणी बांधण्यात आलेला आहे.

त्यामुळे पावसाळ्यात समुद्राच्या लाटांबरोबर येणारा गाळ या बंधाऱ्यामुळे अडवला जाऊन जलवाहतुकीचे नुकसान होत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विंचूर (ता.निफाड जि.नाशिक) येथील पालखेड डावा कालवा सा.क्र. ५६५६५ मी ते ५६६७२ मी.मध्ये पुलाचे बांधकाम व स्लॅबचे बांधकाम करण्याबाबत**

**(१०) ५७११० (२८-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विंचूर (ता.निफाड जि.नाशिक) येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या प्रांगणातील पालखेड डावा कालवा सा.क्र. ५६५६५ मी ते ५६६७२ मी.मध्ये पुलाचे बांधकाम व स्लॅबचे बांधकाम करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी यांनी सचिव, जलसंपदा विभाग, मुंबई यांचेकडे दि. १८ डिसेंबर २०२२ रोजी वा त्या सुमारास मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कामासाठी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद यांनी सचिव, जलसंपदा विभाग, मुंबई यांना दि. २१ एप्रिल २०२२ रोजी वा त्यासुमारास सविस्तर प्रस्ताव पाठवलेला आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, विंचूर (ता.निफाड जि.नाशिक) येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या प्रांगणातील पालखेड डावा कालवा सा.क्र. ५६५६५ मी ते ५६६७२ मी.मध्ये पुलाचे बांधकाम व स्लॅबचे बांधकाम मंजूर करुन निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

वि.स. १९१ (8)

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) जलसंपदा विभाग शासन निर्णय दि.०१/०८/२०१९ नुसार नविन रस्ता पूल बांधणे अथवा अस्तित्वातील कालव्यावर स्लॅबचे बांधकाम करणे या कामांचा समावेश
विशेष दुरूस्ती किंवा विस्तार व सुधारणा प्रकारामध्ये होऊ शकत नाही.तथापि सदरचे काम हे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयातील मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाचे असल्याचे निदर्शनास येत असल्याने या कामाबाबत अन्य स्त्रोतांची पडताळणी करून महामंडळ स्तरावर योग्य तो निर्णय घेण्याबाबत शासनाने
दि.१४ /०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळास कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील वाढवन बंदरामुळे मच्छिमारांवर उपासमारीची वेळ आली असल्याने सदरच्या प्रकल्पाची मान्यता रद्द करण्याबाबत

**(११) ५७११९ (२८-०४-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यात वाढवन येथे केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्तपणे उभारण्यात येत असलेल्या महाकाय वाढवन बंदरामुळे समुद्रात २०० कि.मी. मासेमारी क्षेत्र उध्वस्त होऊन सुमारे ५३३३ कुटुंबातील २० हजार मच्छिमारांवर उदरनिर्वाहाचे संकट येऊन पर्यावरणाचा ऱ्हास होणार असल्याने सदरहू प्रकल्पाची मान्यता रद्द करण्याकरिता मच्छिमार कृती समितीतर्फे मुंबईतील आझाद मैदानात दिनांक २१ नोव्हेबंर, २०२२ रोजी वा त्यासुमारास आंदोलन करण्यात येऊनही अद्याप त्याची शासनाकडून दखल घेण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्पात स्थानिक मच्छिमारांचे जीवन उध्वस्त होऊन त्यांच्यावर बेकारीचे संकट कोसळणार असल्याने याबाबत राज्य शासनाने केंद्र सरकारबरोबर पत्र व्यवहार व समन्वय साधून उक्त समस्या सोडविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे ,
(३) असल्यास, केंद्रीय सागरी मत्स्य संशोधन राज्य तथा केंद्र सरकारला सादर केलेल्या अहवालात मोठ्या प्रमाणात मच्छिमार बाधीत होणार असल्याचे नमुद करण्यात आले असल्याने सदरहू प्रकल्प रद्द करावा या मागणीसाठी मच्छिमार कृती समितीने माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना दिलेल्या लेखी निवेदनानुसार शासनाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (२८-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.
नियोजित वाढवण बंदर रद्द करण्याची वाढवण बंदर विरोधी संघर्ष समितीची मागणी आहे. समितीने केंद्र शासन, पर्यावरण विभाग,महाराष्ट्र राज्य व डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरण यांना प्रतिवादी करून मा. सर्वोच्च न्यायालयात रिट याचिका क्र.२८७/२०२० दाखल केले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
याशिवाय काही मच्छिमार संस्थांनी वाढवण बंदर विरोधात डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरण यांचेकडे निवेदने सादर केली असून त्यावर सुनावणीची कार्यवाही प्रगतीत आहे.
(२), (३) व (४)
जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार प्रस्तावित बंदराकरिता ICAR-CMFRI यांचेकडून मच्छिमारांची लोकसंख्या, सामाजिक व आर्थिक स्थिती, मासेमारी पध्दती, नौका आणि मत्स्यसंपत्तीचा अभ्यास करण्यात आला आहे.
केंद्रीय सागरी मत्स्यपालन संस्था (CMFRI) मार्फत तटीय मत्स्यव्यवसायावर प्रस्तावित वाढवण बंदराच्या प्रभावाचा अभ्यास करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने बंदर प्रकल्पामुळे बाधीत होणा-या मच्छिमारांशी सल्ला मसलत करून मच्छिमारोना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार उचित कार्यवाही करण्यात येणार आहे.

वाढवण बंदर परिसरात नेविगेशनल चॅनेल (सुरक्षेच्या कारणास्तव) वगळता मच्छिमारांना मासेमारी करता येईल. तसेच CMFRI मार्फत अधिक खोल समुद्रात मासेमारी करण्यासाठी प्रशिक्षण, उपकरणे व आधुनिक मासेमारी बंदर यासाठी मदत करण्यात येणार आहे. जेएनपीएद्वारे सीएसआर उपक्रमांच्या माध्यमातून स्थानिक क्षेत्राचा सामाजिक, आर्थिक विकास होईल व सर्व सुविधांसहीत आधुनिक मासेमारी बंदराची निर्मीती विचाराधीन आहे.

तसेच तेथील स्थानिक डायमेकर्स (Dye-makers) यांचेवरही कोणताही परिणाम होणार नाही. तथापि, पारंपारिक व आधुनिक पध्दतीने काम करण्यास प्रशिक्षण दिले जाणार आहे. स्थानिक लोकांची रोजगारक्षमता सुधारण्यासाठी जेएनपीएने सरकार मान्यताप्राप्त प्रशिक्षण संस्थांद्वारे २४ व्यवसायामध्ये इच्छूक बेरोजगार व्यक्तींचा कोशल्य विकास सुरू केला आहे. जेएनपीए मार्फत तयार करण्यात आलेल्या विविध अहवालां मधील निष्कर्षांचा अभ्यास करून तसेच सर्वोच्च न्यायालय, डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरण (डीटीपीए) यांचे निर्णय विचारात घेऊन बंदर प्रकल्पाबाबत निर्णय घेण्याची बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीत आहे.
त्यानुसार जेएनपीए यांचेकडून पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

---

## राज्य शासनाच्या गृह विभागातील अधिकारी व कर्मचा-यांना महसूल विभागातील अधिकारी व कर्मचा-यांप्रमाणे वेतन श्रेणी देण्याबाबत

**(१२) ५७२३५ (३०-०४-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या एकाच श्रेणीत येणा-या महसुल व गृह विभागातील अधिकारी व कर्मचा-यांच्या वेतन श्रेणीत तफावत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महसूल व गृह विभाग एकाच श्रेणीत येत असूनही महसूल विभागाच्या तुलनेने गृह विभागातील अधिकारी व कर्मचा-यांना कमी वेतनात जास्तीचे काम दिले जात असून तहसिलदार व पोलीस निरीक्षक एकाच श्रेणीत येत असून सुद्धा वेतनामध्ये ३५ ते ४० टक्क्यांची तफावत आढळून येत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सहाव्या वेतनाच्या आयोगानुसार गृह विभागातील अधिकारी व कर्मचा-यांना महसूल विभागातील अधिकारी व कर्मचा-यांप्रमाणेत वेतन श्रेणी करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून गृह विभागातील अधिकारी व कर्मचा-यांना महसूल विभागातील अधिकारी व कर्मचा-यांप्रमाणे वेतन श्रेणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (२६-०६-२०२३) :** (१) व (२) वेतनश्रेणीच्या अनुषंगाने अंशत: खरे आहे.

५ व्या वेतन आयोगामध्ये महसूल विभागातील तहसिलदार आणि पोलीस विभागातील पोलीस निरीक्षक या पदांची वेतनश्रेणी सारखीच होती. ती खालीलप्रमाणे आहे.

| पदनाम | वेतनश्रेणी |
|---|---|
| तहसिलदार | वेतनबँड रू.७४५०-११५०० |
| पोलीस निरीक्षक | वेतनबँड रू. ७४५०-११५०० |

६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी

| पदनाम | वेतनश्रेणी |
|---|---|
| तहसिलदार | वेतनबँड रू.१५६००-३९१००<br>ग्रेड वेतन रू.५००० |
| पोलीस निरीक्षक | वेतनबँड रू. ९३००-३४८००<br>ग्रेड वेतन रू.५००० |

७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी

| पदनाम | वेतनश्रेणी |
|---|---|
| तहसिलदार | एस-१९: ५५१००-१७५१०० |
| पोलीस निरीक्षक | एस-१८: ४९१००-१५५८०० |

तहसिलदार व पोलीस निरीक्षक या पदांच्या वेतनश्रेणीमध्ये ३५ ते ४० टक्क्यांची तफावत आहे असे म्हणता येणार नाही.

वेतन आयोगाच्या शिफारशी मधील त्रुटी दूर करण्यासंदर्भात राज्य वेतन सुधारणा समिती स्थापन करण्यात येते. सदर समितीच्या कार्यकक्षेत वेतन आयोगाच्या अनुषंगाने सुधारित वेतनसंरचनेची शिफारस करणे आणि वेतन आयोगाच्या वेतनसंरचनेत त्रुटीं असल्यास त्या दूर करण्याबाबत शिफारशीं करणे या बाबी अंतर्भूत असतात. त्यामुळे दोन भिन्न विभागातील कर्मचाऱ्यांचा कामाचा भार, वेतनातील समानता याबाबत देखील सदर समितीने तुलनात्मक अभ्यास करून त्रूटी दूर करण्याबाबत शिफारसी केल्यास त्यावर कार्यवाही करणे अभिप्रेत असते.

(३) हे खरे नाही.

सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने वेतनसुधारणेसंदर्भात शिफारशी करण्यासाठी राज्य शासनाने श्री. के. पी. बक्षी, सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ स्थापन केली होती. सदर समितीच्या कार्यकक्षेत सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने सुधारित वेतनसंरचनेची शिफारस करणे आणि सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनसंरचनेत त्रुटीं असल्यास त्या दूर करण्याबाबत शिफारशीं करणे. या दोन बाबी प्रामुख्याने अंतर्भूत होत्या.

गृह विभागाने बक्षी समितीसमोर "पोलीस निरीक्षक" या संवर्गाच्या वेतनत्रुटींबाबत समितीस प्रस्ताव सादर केला होता. परंतु या संवर्गाबाबत समितीने वेतनत्रुटींसंदर्भात शिफारस केलेली नाही. बक्षी समितीच्या सदर अहवालातील शिफारशींवर दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात येऊन, त्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १३ फेब्रुवारी,२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी समाजातील तरुणांसाठी असलेल्या जागेवर बिगर आदिवासी तरुणांनी नोकऱ्या मिळविल्याबाबत...

**(१३) ५७२६८ (२७-०४-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी समाजातील विद्यार्थी व बेरोजगार तरुणांसाठी शासनाने आदिवासींकरीता बऱ्याच सवलती दिलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय सेवेत नोकरी देताना आदिवासी समाजातील बेरोजगार तरुणांसाठी काही जागा राखीव ठेवण्यात येतात परंतु बऱ्याच जागांवर आदिवासी समाजाचे बनावट प्रमाणपत्र सादर करुन बिगर आदिवासी तरुणांनी नोकऱ्या मिळविल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी समाजातील तरुणांसाठी असलेल्या जागेवर किती बिगर आदिवासी तरुणांनी नोकऱ्या मिळविल्या आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह आदिवासी समाजातील बेरोजगार तरुणांसाठी रोजगार मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (१७-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याचे आदेश दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत. सर्व प्रशासकीय विभागांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार ६८६० अधिकारी/कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेले आहे. म्हणजेच ६८६० बिगर आदिवासींनी आदिवासींच्या राखीव पदावर नोकरी मिळविली आहे.
(४) अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग केल्यामुळे रिक्त झालेल्या अनुसूचित जमातीच्या जागा आदिवासी उमेदवारांमधून भरण्याचे आदेश दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आले आहेत. तसेच, दि. १४.१२.२०२२ च्या शासन निर्णयान्वये गट-"अ" व "ब" गटातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अखत्यारीतील अनुसूचित जमातीची पदे दि. ३१.१२.२०२३ पर्यंत व गट "क" व "ड" ची पदे दि. ३१.०७.२०२३ पर्यंत भरण्याचे निर्देश सर्व संबंधित विभागांना देण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उर्ध्व वर्धा (ता.तिवसा, जि.अमरावती) प्रकल्पाअंतर्गत गुरूकुंज उपसा सिचनास शेतीसाठी पाणी देण्याबाबत**

**(१४) ५७७९० (२८-०४-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील उर्ध्व वर्धा प्रकल्पाअंतर्गत गुरुकुंज उपसा सिंचन योजनेमध्ये शासनाने शेतकऱ्यांसाठी सन २०२२-२०२३ च्या रब्बी हंगामासाठी पाणी सोडले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेनुसार काही भागातील शेतकऱ्यांना पाणी न मिळाल्यामुळे रब्बी हंमाग २०२२-२०२३ मध्ये पिके घेता आली नसून त्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन झालेल्या गैरनियोजनाबाबत दोषी असलेल्या संबंधीतांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०२३) :**
(१) नाही, हे खरे नाही.
(२) नाही, हे खरे नाही. रब्बी हंगाम २०२२-२३ मध्ये ११८७ हे. क्षेत्राकरीता १४१० लाभधारकांनी पाणी मागणी अर्ज सादर केले होते व त्यापैकी कोणाचीही पाणी न मिळाल्याबाबतची तक्रार प्राप्त झालेली नाही. त्यामुळे कुणाचेही आर्थिक नुकसान झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती महावितरणाची विजपुरवठा करणारी 'स्काडा' प्रणाली कूचकामी ठरत असल्याबाबत**

**(१५) ५७८२० (०३-०५-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील महाविरणाच्या 'स्काडा' प्रणालीचे पाच उपकेंद्र तांत्रिक अडचणीमुळे कार्यान्वित नसल्याने नागरिकांना, व्यावसायिकाना, उद्योगधंदयांना वीज पुरवठा होत नसल्याचेमाहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्काडा प्रणालीच्या दुरुस्तीचे कंत्राट माहे जुलै, २०२१ पासून संपले असून, सदर कामाच्या कंत्राटाचे नुतनीकरण करण्याबाबत महावितरण कंपनीच्या मुख्यालय स्तरावर कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दुरुस्तीचे कंत्राट नुतनीकरण करुन अमरावतीमधील स्काडा प्रणालीव्दारा बंद असलेला वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.
अमरावती स्काडा वितरण प्रणाली अंतर्गत १४ उपकेंद्र हे स्काडा प्रणालीवर असून त्यापैकी ९ उपकेंद्रे स्काडाव्दारे कार्यान्वित आहेत व उर्वरित ५ उपकेंद्र स्काडाव्दारे कार्यान्वित नाहीत. परंतु सदर ५ उपकेंद्रामध्ये प्रचलित पध्दतीनुसार वीज पुरवठा अखंडीत सुरु आहे.
(२) हे खरे आहे.
(३) स्काडा प्रणालीच्या देखभाल-दुरुस्तीचे कंत्राट संपुष्टात आले आहे. केंद्र सरकारच्या वितरण क्षेत्र सुधार योजने (आरडीएसएस) अंतर्गत अमरावती स्काडा प्रणालीच्या नुतनीकरणाचे काम प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सार्सी (गाईची ) (ता. तिवसा, जि.अमरावती) येथील वीज वितरण पुरवठा कमी दाबाने होत असल्याबाबत**

**(१६) ५७८२५ (३०-०४-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील सार्सी (गाईची ) या गावातील वीज पुरवठा सार्सी ते माहुली जहॉगीर असा सरळ न होता तो ३० ते ३५ कि.मी अंतरावरुन होत असल्यामुळे वीज पुरवठा कमी दाबाने होत असल्यामुळे कृषी पंप वारंवार जळतात असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सार्सी येथील वीज पुरवठा तिवसा येथून झाल्यास वीज पुरवठा कमी दाबाने होण्याची समस्या सुटणार असून याकरिता विदयुत मंडळास रु. ३३,७४,९८४/- खर्च येणारअसून तसा प्रस्ताव माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान विदयुत मंडळाने शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन सार्सी गावाची विदयुत समस्या लक्षात घेता शासनाने सदर प्रस्तावावर निर्णय घेवून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०२३) :** (१) हे अंशत खरे आहे.

३३ के.व्ही माहुली सबस्टेशन मधून निघणाऱ्या ११ के.व्ही. डावर गाव उच्चदाब वाहिनी वरुन सार्सी गावाला वीज पुरवठा होतो. सार्सी ते माहुली हे अंतर २४ किलो मीटर असल्यामुळे महावितरणच्या माहूली गावातील ग्राहकांना कमी दाबाचा विद्युत पुरवठा होत आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सार्सी गावाकरिता गावठाण व शेतीकरिताचा वीज पुरवठा माहुली ऐवजी आठ किलोमीटर वर असलेल्या तिवसा येथून करण्याकरिता सद्यस्थितीतील ११ केव्ही डवरगांव वीज वाहिनीवरुन होणारा वीज पुरवठा ११ के.व्ही. सातरगांव वीज वाहिनीवर स्थलांतरीत करण्याकरिता रु.४३.७४ लक्ष इतक्या रकमेचा प्रस्ताव तांत्रिकदृष्टया महावितरणने जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेत समाविष्ट करण्यास्तव सादर केला आहे.

(३) सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेमध्ये सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता व निधी प्राप्त झाल्यावर काम पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील वीज समस्या सोडविण्याबाबत

**(१७) ५७९४३ (३०-०४-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील वीज समस्या सोडविण्यासाठी मदत व्हावी यासाठी जिल्हा नियोजन समितीने गतवर्षी ५ कोटी रुपयांचा निधी महावितरणला दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीच्या दुसऱ्यांदा निविदा काढूनही अद्याप काम सुरुच झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा नियोजनमधून मिळालेल्या निधीची पहिली निविदा रद्द करण्या मागील कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने परभणी जिल्ह्यातील वीज समस्या सोडविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षा करिता जिल्हा वार्षिक (सर्वसाधारण) योजनेअंतर्गत रु.५.६५ कोटी चा निधी दि.१२.०५.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर निधी अंतर्गत दि. २१.०९.२०२२ रोजी काढण्यात आलेल्या निविदा रद्द करुन दि. ०४.१०.२०२२ रोजी दुसऱ्यांदा निविदा काढण्यात आल्या. सदर निविदा अंतर्गत रु. ३.४६ कोटीची कामे पुर्ण करण्यात आली असून उर्वरित रु.२.१९ कोटीची कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) मंजूर असलेली कामे तातडीने अधिकृत ठेकेदार मार्फत करुन घेण्याकरिता विभागनिहाय दोन निविदा काढण्यात आल्या. सदर दोन्ही निविदा प्रसिध्द करतेवेळी मुल्य निविदा प्रपत्र चुकीचे प्रसिध्द झाले होते. त्यामुळे भविष्यात कोणतीही तक्रार व न्यायालयीन प्रकरण निर्माण होऊ नये याकरीता दोन्ही निविदा रद्द करण्यात आल्या.

(४) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२१-२२ च्या फेर निविदा दि. ०४.१०.२०२२ रोजी काढून पात्र विद्युत ठेकेदारास कार्यदेश देण्यात आले असून सदरची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच परभणी जिल्हयातील वीज वितरण व्यवस्था सक्षमीकरण करण्याकरीता व वीज गळती रोखण्याकरीता केंद्र शासन पुरस्कृत सुधारीत वितरण क्षेत्र योजना (RDSS) अंतर्गत रु.३६९.३३ कोटीची विविध कामे प्रस्तावित करण्यात आली असून निविदाप्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वळणे (तर.दापोली, जि.रत्नागिरी) येथील एमआयडीसी मध्ये वारंवार विदयुत पुरवठा खंडित होत असल्याबाबत**

**(१८) ५८०४५ (३०-०४-२०२३). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वळणे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील एमआयडीसीमध्ये वारंवार विद्युत पुरवठा खंडित होतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वीज पुरवठा वारंवार खंडित होण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, वीज पुरवठा सुरळित होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

११ केव्ही दाभोळ गावठाण फीडरवरती वळणे एमआयडीसी जोडली आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे विद्युत पुरवठा खंडीत होण्याच्या प्रमाणामध्ये वाढ होते.

(२) एमआयडीसी वळणे ही ३३/११ केव्ही दापोली उपकेंद्रातून निघणाऱ्या ११ केव्ही दाभोळ वाहिनीवर आहे.३३/११ केव्ही दापोली उपकेंद्राला २२०/३३ केव्ही दस्तुरी उपकेंद्र येथून विद्युत पुरवठा केला जातो, त्यासाठी ३३ के.व्ही. दापोली व ३३ के.व्ही हर्णे हे २ इनकमर वाहिनी आहेत.

सदर फीडर हे घनदाट जंगलातून जातात, त्यामुळे पावसाळयाच्या दिवसात वाहिनीवर वारंवार बिघाड होतो. ३३/११केव्ही दापोली उपकेंद्राला वीजपुरवठा करणाऱ्या ३३ केव्ही दापोली लाईनवर (इनकमर) बिघाड झाल्यास, तसेच ५५ कि.मी. लांबीच्या व घनदाट जंगलातून जाणाऱ्या ११ केव्ही दाभोळ एकदळ वीज वाहिनीवर बिघाड झाल्यास, वळणे एमआयडीसीचा विद्युत पुरवठा खंडीत होत असतो. सदर बिघाडाचे प्रमाण पावसाळयात दिवसात जास्त असल्याने वळणे एमआयडीसी मध्ये विद्युत पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण पावसाळयात वाढते.

(३) वळणे एमआयडीसीचा वीज पुरवठा सुरळीत होण्यासाठी ३३ केव्ही दापोली लाईन व ११ केव्ही दाभोळ वाहिनीची नियमित देखभाल व दुरुस्ती करण्यात येत असते. त्यामध्ये वाहिनी जवळील वाढलेली झाडे तोडणे, जीर्ण झालेल्या विद्युत तारा बदलणे, गंजलेले पोल बदलणे इत्यादी कामे करण्यात आली आहेत. त्याशिवाय ११ केव्ही दाभोळ वाहिनीची लांबी कमी करण्यासाठी वाहिनीवरील शेवटच्या काही वाहिनीचे विभाजन करुन नवीन ११ केव्ही बुरोंडी वाहिनी सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे विद्युत पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण कमी झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे काम अदानी रिॲल्टी या कंपनीला देण्याचा घेतलेला निर्णय**

**(१९) ५८१८१ (३०-०४-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे काम अदानी रिॲल्टी या कंपनीला देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी पुनर्विकास प्रकल्पाची निविदा रद्द करण्यात आली हे खरे आहे काय,

(३) असल्यास, निविदा रद्द करण्यामागील कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने धारावी पुनर्विकास तातडीची पूर्ण होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (१७-०७-२०२३) :** (१) धारावीतील सेक्टर १ ते ५ चा पुनर्विकास शासन निर्णय दिनांक ०५.११.२०१८ व दिनांक २८.०९.२०२२ अन्वये विशेष हेतू कंपनीमार्फत (SPV) एकत्रितरित्या करण्याचे प्रस्तावित आहे. त्याकरिता धारावी पुनर्विकास प्रकल्प, मुंबई यांनी दिनांक ०१.१०.२०२२ रोजी मुख्य भागीदाराच्या नेमणुकीकरिता जागतिक निविदा मागविल्या होत्या. सदर निविदा प्रक्रीयेअंतर्गत मे. अदानी प्रॉपर्टीज प्रा. लि. हे उच्चतम निविदाकार ठरले आहेत.

(२) व (३) धारावी पुनर्विकास प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी दि. २८ नोव्हेंबर २०१८ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये मे. सेकलिंक व टेक्नॉलाजी कन्सोरसियम व मे.अदानी इन्फ्रा व कन्सोरसियम यांनी निविदा सादर केल्या होत्या. तथापि रेल्वेच्या जागेच्या हस्तांतरणाबाबत सविस्तर अटी व शर्तींचा समावेश निविदा प्रक्रियेच्या पश्चात केल्यामुळे निविदा प्रक्रियेत भौतिक बदल (Material Change) झाला आहे असे अभिप्राय माननीय महाधिवक्ता महाराष्ट्र राज्य यांनी दिल्यामुळे दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ पासून सुरू केलेली धारावी पुनर्विकास प्रकल्पाची निविदा प्रक्रिया रद्द करुन फेर दुरूस्तीसह नव्याने सुधारित निविदा मागविण्याचा निर्णय घेतला. त्यास मा. मंत्रिमंडळाने सहमती दिली.

(४) धारावी पुनर्विकास प्रकल्प राबविण्याच्या अनुषंगाने विविध विभागाकडून पूर्ण शासन निर्णय/ अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही चालू शासन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाघोली परिसरामध्ये २०० MWA क्षमता असलेले अतिउच्च दाब केंद्र निर्माण करण्याबाबत**

**(२०) ५८३८७ (३०-०४-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील वाघोली या गावातील वीज ग्राहकांना सद्य:स्थितीत लोणीकंद पावर हाऊस येथून वीज पुरवठा केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावाचा समावेश एका वर्षापूर्वी पुणे महानगरपालिकेमध्ये झालेला असून या गावाची लोकसंख्या सुमारे ३ लाखांच्या पुढे असून वाघोली गाव शहरानजिक असल्याने आगामी काळात १७० MW ची पावर करिता विजेची आवश्यकता लागणार असून नवीन वीज मागणी करिता प्रयात्प क्षमता उपलब्ध नसल्याने वीज टंचाई निर्माण होऊ शकते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वाघोली परिसरामध्ये २०० MWA क्षमता असलेले अतिउच्च दाब केंद्र होण्याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) वाघोली परिसरातील वाढती विजेची मागणी पुर्ण करण्यासाठी तातडीची उपाययोजना म्हणून सद्यस्थितीत वाघोली परिसरास वीज पुरवठा करणाऱ्या ४००/२२०/२२ केव्ही लोणीकंद अतिउच्चदाब उपकेंद्रामध्ये नवीन अतिरिक्त ५० MVA क्षमतेचे रोहित्र उभारण्याचे काम महापारेषण कंपनीतर्फे प्रगतीपथावर आहे. यामुळे लोणीकंद अति उच्च दाब उपकेंद्राची क्षमता वाढ होऊन ती २०० MVA होणार आहे. तसेच भविष्यात नव्याने विकसित होणाऱ्या गृह संकुल व विविध संवर्गातील वीज ग्राहकांच्या वाढत्या वीजेच्या मागणीचा विचार करुन, सदर परिसरातील वीज ग्राहकांना योग्य दाबाने व अखंडीत वीज पुरवठा करणे शक्य व्हावे यासाठी वाघोली परिसरात नवीन २०० MVA क्षमतेचे अति उच्च दाब उपकेंद्र उभारणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या जागेच्या उपलब्धतेसाठी मा. जिल्हाधिकारी, पुणे जिल्हा व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. जागेच्या उपलब्धतेनुसार तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता तपासून नवीन अतिउच्चदाब उपकेंद्राबाबत पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वारसा संपत्ती, विवाह, घटस्फोट ई. बाबतीत कायदे करण्याबाबत

**(२१) ५८४७८ (१६-०५-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वारसा संपत्ती, विवाह, घटस्फोट ई. बाबतीत कायदे करण्याचा अधिकार राज्य शासनास आहे अशा स्वरूपाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतीत राज्यामध्ये वेगवेगळया कायद्यांमध्ये समानता यावी याकरिता शासन विचाराधीन आहे काय?

(३) असल्यास, शासन याकरिता समिती स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०२३) :** (१) सर्वोच्च न्यायालयाचा अशा स्वरूपाचा निर्णय शासनास प्राप्त झालेला नाही. त्यामुळे यावर निश्चित असे भाष्य करता येत नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कसबेगव्हाण (ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती) येथे ३३/११ के. व्ही. उपकेंद्र उभारणीकरीता कृषी आकस्मिकता निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(२२) ५८५३१ (३०-०४-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कसबेगव्हाण (ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती) येथे ३३/११ के. व्ही. उपकेंद्र कृषी आकस्मिक निधी अंतर्गत प्रस्तावित केले असून महावितरण सांघिक कार्यालय , प्रकाशगढ मुंबई यांच्या मार्फत तांत्रिक मंजूरी प्राप्त असून सदर उपकेंद्रास रु. ४.०४ कोटी निधी अपेक्षित असल्याचे माहे जानेवारी २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी उपलब्ध करून देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे मे २०२२ च्या सुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे हे खरे आहे काय ,

(३) असल्यास, कसबेगव्हाण (ता. अंजनगाव सुर्जी) येथील ३३/११ के. व्ही उपकेंद्र उभारणीकरीता कृषी आकस्मिक निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) कसबेगव्हाण (ता. अंजनगाव सुर्जी) येथे कृषी आकस्मिकता निधीमधून नवीन ३३/११ केव्ही उपकेंद्र उभारणीकरीता लागणाऱ्या रु. ४.३४ कोटीच्या कामाचा कार्यादेश दि.२०.१२.२०२२ रोजी देण्यात आला असून उपकेंद्र उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### विदर्भातील शासकीय आदिवासी आश्रम शाळांमध्ये मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(२३) ५८७७५ (२७-०४-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील शासकीय आदिवासी आश्रम शाळांमध्ये मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव असल्याप्रकरणी दिनांक ४

जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास न्यायालयाने राज्य शासनास नोटीस बजावून चार आठवडयात स्पष्टीकरण सादर करण्याचे निर्देश दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्देशानुसार शासनाने स्पष्टीकरण सादर केले आहे काय, तसेच स्पष्टीकरणाचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने स्पष्टीकरण सादर करण्यासह आदिवासी आश्रम शाळांना मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१०-०८-२०२३) :** (१) (२) व (३) गडचिरोली जिल्हयातील ४ शासकीय व १ अनुदानित आश्रमशाळांमध्ये सोयी-सुविधांचा अभाव असल्याबाबत मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठ येथे जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यानुषंगाने अपर आयुक्त, नागपूर यांनी तपासणी समिती गठीत केली. तपासणी समितीस या आश्रमशाळेमध्ये पुरेशा सोयी-सुविधा असल्याचे आढळून आले असून ज्या ठिकाणी किरकोळ त्रुटी आहेत त्यांची पूर्तता करण्याबाबत संबंधितांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

### उर्ध्व पेनगंगा प्रकल्पासाठी पाणीसाठ्याच्या पुन:नियोजन व पुनर्विलोकन प्रस्तावास मान्यता देण्याबाबत

**(२४) ५९८४९ (०३-०५-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलसंपदा विभागाच्या दिनांक १२ नोव्हेंबर, २०२१ च्या पत्राने अनुज्ञेय होणाऱ्या पाण्यातून अस्तित्वात असलेल्या धरणाच्या उर्ध्व बाजूस कोणतेही नविन प्रकल्प घेण्यात येवू नयेत याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भारतीय मानक ५२७७ भाग-१ १९६९ मधील मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने शासन पत्र दिनांक १७ जानेवारी, २०२२ नुसार उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात भविष्यकालीन योजनांसाठी पाणी आरक्षित करता येणार नाही असेही स्पष्ट करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जलसंपदा विभागाने उर्ध्व पेनगंगा प्रकल्पामध्ये तूट असतानाही उर्ध्व पेनगंगा प्रकल्पातील पाणी अन्य जिल्ह्यांना उपलब्ध करुन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उर्ध्व पेनगंगा प्रकल्पामध्ये सद्यास्थितीत असणारी पाण्याची तूट भरुन काढण्यासाठी प्रकल्पातील पाणीसाठा व पाणी वाटपाच्या पुन:नियोजन व पुनर्विलोकनाची आवश्यकता असल्याने उक्त उर्ध्व पेनगंगा प्रकल्पासाठी पाणीसाठ्याच्या पुन:नियोजन व पुनर्विलोकन प्रस्तावास मान्यता देण्यास शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०८-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
शासनाचे पत्र क्र.संकिर्ण -२०२१/(१९३/२०२१)/ जसंअ दि.१२/११/२०२१ नुसार अट क्र (अ) अन्वये - "पैंनगंगा उपखोऱ्यातील उपरोक्त अनुज्ञेय होणाऱ्या पाण्यातुन अस्तीत्वातील धरणांच्या उर्ध्व बाजुस कोणताही नवीन प्रकल्प घेतला जाणार नाही याची दक्षता घ्यावी जेणे करुन त्या धरणाच्या पाणीवापरात तुट येणार नाही," असे स्पष्ट नमुद करण्यात आलेले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
शासन पत्र क्र. संकिर्ण २००७/(२५७/२००७) दि. १७.०१.२००८ नुसार मंजूर समरुपता अभ्यासास मान्यता देण्यात

आलेली आहे. सदर शासन पत्रानुसार भारतीय मानक ५४७७ भाग-१ सन १९६९ नुसार सिंचनासाठी ७५% यशस्विता आवश्यक असल्याचे नमुद करण्यात आलेले आहे. या पत्रानुसार Net Irrigation Requirement (NIR) मध्ये १५ टक्के कपात करून व सापळी धरणाच्या पाणीसाठयाचा पुर्ण वापर करून प्रकल्पाचे लाभक्षेत्र १०७०९० हे. व यशस्विता ७५% या पर्यायानुसार समरुपता अभ्यासास मान्यता देण्यात आलेली आहे.
तसेच यापुढे इसापुर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात भविष्यकालीन योजनांसाठी पाणी आरक्षित करता येणार नाही व सापळी धरणाचे काम प्राधान्याने करण्यात यावे, असे नमूद करण्यात आलेले आहे.
(३) होय, हे खरे आहे.
१. शासन पत्र क्र. पाऊप्र/२००८ / (१०३/०८) जसअ, दि. १८/३/२००८ अन्वये १०५.१३ दलघमी पाणी हिंगोली व वाशीम जिल्ह्यास उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.
२. शासन पत्र क्र. संकिर्ण २०१८/(४०/२०१८) दि. १८/५/२०१८ अन्वये नियोजीत सापळी धरणाच्या १९९ दलघमी पाणी वापरातून कमी करुन ६१.४३ दलघमी पाणी हिंगोली जिल्ह्याच्या सिंचन अनुशेष निर्मुलना साठी उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.
(४) इसापूर धरणात प्रत्यक्ष येव्यानुसार ५८२ दलघमी ची तुट व सापळी धरण न झाल्यामुळे त्याची असलेली १९९ दलघमी ची तुट भरून काढण्यासाठी पर्यायी अभ्यास शासनास सादर करण्यात आलेला होता. त्यापैकी कयाधु नदीवर खरबी येथे उच्च पातळी बंधारा बांधुन प्रवाही पध्दतीने इसापूर धरणात १०९ दलघमी पाणी वळविण्यास शासन पत्र दि.१३.०३.२०१९ अन्वये तत्वत: मान्यता प्राप्त असून, यास मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान, नाशिक यांचेकडुन दि.२३.०४.२०२१ अन्वये १०२.४६ दलघमी करिता पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त आहे.
तदनंतर मुख्य अभियंता जलविज्ञान व धरण सुरक्षितता, नाशिक यांचे दि. २७.०१.२०२३ चे पत्रान्वये कयाधू नदीवर गोजेगाव (संगमचिंचोली) येथे उच्च पातळी बंधारा बांधून उपसा द्वारे ९७ दलघमी व पेनगंगा नदीवर दिगडी उच्च पातळी बंधाऱ्यातून ५८२ दलघमी पाणी वापरासाठी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.
त्यानुसार उर्ध्व पेनगंगा प्रकल्पामध्ये सद्यास्थितीत असणारी पाण्याची तूट भरून काढण्याच्या पुनर्नियोजन व पुनर्विलोकन बाबतचा प्रस्ताव महामंडळ कार्यालयाचे पत्र दि.१४/०३/२०२३ अन्वये शासनास सादर करण्यात आलेला असून पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## कल्याण मनपा क्षेत्रामध्ये बोगस कागदपत्रांच्या आधारे बनावट रेरा प्रमाणपत्र तयार करून ग्राहकांची केलेली फसवणूक

**(२५) ५९८६४ (२७-०४-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामान्य जनतेची विकासक/बांधकाम व्यावसायिकांकडून होणारी फसवणुकी टाळून सर्वसामान्यांना संरक्षण मिळण्याकरीता महारेरा अंतर्गत गृह प्रकल्पांची नांदणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अलिकडेच कल्याण मनपा क्षेत्रामध्ये बोगस कागदपत्रांच्या आधारे बनावट रेरा प्रमाणपत्र तयार करुन इमारती बांधून ग्राहकांची फसवणूक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कल्याण डोंबिवली महानगर पालिकेमध्ये निदर्शनास आलेल्या प्रकरणांप्रमाणेच राज्यातील अन्य शहरांमध्येही अशी प्रकरणे उघडकीस आली आहेत काय,
(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन संबंधीतांविरुध्द कोणती कार्यवाई करण्यात आली आहे अथवा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१७-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे,
(२) कल्याण मनपा क्षेत्रात बोगस कागदपत्रांच्या आधारे प्रकल्प नोंदणीकृत झाल्याचे आढळून आले आहे.
(३) असे आढळून आले नाही.
(४) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीत बनावट बांधकाम परवानग्या देऊन महारेरातर्फे नोंदणी क्रमांक मिळवल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने महारेरा तर्फे सदर विकासकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली व सुनावणी घेऊन ६९ प्रकल्प रद्द करण्यात आले आहेत. तसेच ६९ प्रकल्पातील बँकाना सदर विकासकांची बँक खाते गोठविण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच सदर प्रकल्पांच्या सदनिकांची खरेदी /विक्री होऊ नये या करिता संबंधित उपनिबंधकास महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणातर्फे कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मंचर (जि.पुणे) येथील श्रीक्षेत्र भीमाशंकर येथील दर्शन घेण्यासाठी देण्यात येणाऱ्या पासमध्ये होत असलेला गैरव्यवहार

**(२६) ६०७५३ (२७-०४-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंचर (जि.पुणे) येथील श्रीक्षेत्र भीमाशंकर येथील दर्शन पाससाठी रक्कम देऊनही शासकीय पावती मिळत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली, आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार संबंधित दोषी व्यक्तींवर शासनाकडून कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०७-२०२३) :** (१) शासकीय पावती मिळत नाही ही बाब खरी आहे.
तथापि, श्री. क्षेत्र भीमाशंकर येथे महाशिवरात्री, श्रावणी सोमवार यात्रा, सार्वजनिक सुट्टी, इतर सणाचे दिवस व सुट्टीच्या दिवशी देवस्थानच्या शिक्क्यासह छापील दर्शनपास प्रतिव्यक्ती रु.५००/- दिला जातो.
(२) व (३) सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे यांचेमार्फत केलेल्या चौकशी मध्ये वरील बाब आढळून आली. याबाबत निरिक्षक धर्मादाय सह आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याकडे प्रकरण आदेशाकरिता प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजा सेलगांव लवणे, (ता. कांरजा, जि. वर्धा) येथील कार नदी प्रकल्पावरून उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(२७) ६०७७१ (२६-०४-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी मौजा सेलगांव लवणे, ( ता. कारंजा, जि. वर्धा ) येथील कार नदी प्रकल्पावरून उपसा सिंचन कार्यान्वित होण्याबाबत सुधारित प्रस्ताव सादर करणार आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पावरून उपसा सिंचन योजना कार्यान्वित होण्याबाबत (विकाक क्र. ३०५८७८५) कार्यकारी अभियंता विदर्भ पाटबंधारे विकास मंडळ, नागपूर यांनी दिनांक ०१ ऑगस्ट, २०१८ नूसार सुधारित प्रस्ताव मान्यते साठी सादर केलेला प्रस्ताव नाकारण्यात आला, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मा. लोकप्रतीनीधी यांनी दिनांक २६ नोव्हेंबर, २०२२ चे पत्रानुसार मंत्री महोदयांना नव्याने शासन निर्धारित मापदंडात प्रस्ताव सादर करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, केलेल्या चौकशीनुसार मौजा सेलगांव लवणे उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबनाचे कारण काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०८-२०२३) :**(१) नाही.
(२) होय,
कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर यांनी शासनास सादर कलेल्या दि.१३.०३.२०१८ चा प्रस्ताव व दि.०१.०८.२०१८ च्या सुधारीत प्रस्तावात विषयांकित योजना शासन निर्धारित मापदंडात बसत नसल्याने सदर प्रस्तावास मंजुरी देणे शक्य नसल्याचे अभिप्राय दिल्याने शासन स्तरावरुन सदर प्रस्तावाबाबत पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(३) मा.लोकप्रतिनिधींचे दि.२६.११.२०२२ चे पत्र विभागास अद्यापपर्यंत प्राप्त झालेले नाही .
(४) कार नदी प्रकल्पातील संपुर्ण पाणीसाठयाचे नियोजन झालेले आहे. प्रकल्पामध्ये पाणी उपलब्ध नसल्याने सेलगाव लवणे उपसा सिंचन योजना हाती घेणे शक्य होणार नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी विकास विभागांतर्गत शासकीय वसतीगृहात विद्यार्थ्यांना वेळेवर प्रवेश देण्याबाबत

**(२८) ६०८९७ (०८-०५-२०२३). डॉ.किरण लहामटे (अकोले) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शासकीय वसतिगृहातील प्रवेश प्रक्रिया ही जानेवारी, २०२३ पर्यंत सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यास शासकीय अधिकाऱ्यांकडून झालेल्या दिरंगाईबाबत विद्यार्थ्यांनी शासनाकडे तसेच लोकप्रतिनिधींकडे तक्रारी केल्या असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, केलेल्या चौकशीनुसार संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह क्षमता वाढवून प्रवेश प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (२४-०७-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
माहे डिसेंबर अखेर वसतीगृहातील नियमित प्रवेश प्रक्रीया पुर्ण करण्यात आली परंतु केवळ व्यावसायिक अभ्यासक्रमाचा निकाल उशिराने लागल्यामुळे संकेतस्थळ माहे जानेवारी, २०२३ पर्यंत ठेवण्यात आले होते.
(२) होय, हे खरे आहे.
(३) वसतीगृह प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त मागणी असणाऱ्या वसतीगृहात रिक्त असलेल्या वसतीगृहातील जागा वर्ग करुन प्रवेश प्रक्रीया पुर्ण करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महावितरण कंपनीच्या विद्युत सहाय्यक भरती प्रक्रियेत आय.टी.आय. गुणांनुसार गुणवत्ता लावण्याबाबत

**(२९) ६०९१० (२७-०४-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरण कपंनीमध्ये विदयुत सहाय्यक यांची भरती प्रकियेवेळी आय.टी.आय वायरमन किंवा इलेक्ट्रिशिन अशी शैक्षणिक अर्हता आवश्यक असताना भरती प्रक्रियेमध्ये दहावीचे गुणवार गुणवत्ता लावली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भरती प्रक्रियेत आय.टी.आय. पास असणे आवश्यक असताना व आय.टी.आय. च्या गुणानुसार गुणवत्ता लावली जात नसल्याने आय.टी.आय. मध्ये चांगले गुण असतानाही उमेदवार या भरती प्रक्रियेपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरण कंपनीच्या विदयुत सहाय्यक भरती प्रक्रियेसाठी आय.टी.आय. गुणवत्तेनुसार भरती प्रक्रिया राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) संचालक मंडळ यांचा ठराव क्र. ९७ दि. ०७.०५.२०१२ व त्या अनुषंगाने वर्गीकरण व सेवाप्रवेश विनिमय - २००५ चे दुरूस्तीचिठ्ठी क्र. ४७ दि. ०६.०६.२०१२ अन्वये तंत्रज्ञ (विद्युत सहाय्यक) पदाकरीता महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १०+२ बंधातील एस.एस.सी परीक्षा अथवा तत्सम परीक्षेतील एकूण सरासरी गुणाच्या आधारे निवड करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पश्चिम विदर्भातील खारपान पट्ट्यातील बॅरेजची शृंखला अपूर्ण असल्याबाबत

**(३०) ६०९१५ (०८-०५-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) : दिनांक - रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक मधील प्रश्न क्रमांक ५२६२० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पश्चिम विदर्भातील पूर्णा नदीच्या पूर्व व पश्चिम आशा दोन्ही भागांनी साधारणत: ४० ते ५० किलोमीटर रुंद व १५५ किलोमिटर लांब खारपानपट्टा असून अकोला , बुलढाणा , आणि अमरावती जिल्ह्यातील १६ तालुक्यातील ८९२ गावांचा समावेश असून तीन लाख हेक्टर क्षेत्रफळ असून या भागातील माती चोपण आणि पिण्याचे पानी खारे असल्याचे निदर्शनास आले, आहे हे खरे आहे काय,
(२) खारपाण पट्ट्याचा भूभाग असलेल्या अमरावती तसेच अकोला बुलढाणा जिल्ह्यातील नागरीकाना , शेतकऱ्यांना सिंचनासाठी गोडे पाणी उपलब्ध व्हावे म्हणून शासना मार्फत बॅरेजची शृंखला तयार करण्यात आली असून यात अमरावती जिल्ह्यातील चंद्रभागा बॅरेज , वाघाडी बॅरेज , सामदा लघु व मध्यम प्रकल्प , या सिंचन प्रकल्पाचा समावेश असून सदर प्रकल्पना सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त नसल्याने सदर प्रकल्प प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पश्चिम विदर्भातील खारपान पट्ट्यातील बॅरेजची शृंखला पूर्ण करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०७-२०२३) :**(१)हे अंशत: खरे आहे,
शासन निर्णय दि.०३/०१/२००८ नुसार अकोला, बुलढाणा आणि अमरावती जिल्ह्यातील १६ तालुक्यातील ८९४ गावांचा समावेश असून यात ४,६९,२२२ हेक्टर क्षेत्रफळ समाविष्ट असून या भागातील माती चोपण आणि पिण्याचे पाणी खारे आहे.
(२) अमरावती जिल्हयातील वाघाडी बॅरेज व सामदा सौंदडी लपा प्रकल्प यांचा व्दीतीय सुप्रमा प्रस्ताव SLTAC ला सादर असून SLTAC च्या सहमतीने शासनास प्रस्ताव सादर झाल्यानंतर तसेच चंद्रभागा प्रकल्पाचा सुप्रमा प्रस्तावावर वित्त व नियोजन विभागाने उपस्थित शे-यांची पुर्तता करुन परिपुर्ण प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर सुप्रमाची कार्यवाही करणे नियोजित आहे.
बुलढाणा मंडळांतर्गत जिगाव प्रकल्प व काटेपुर्णा बॅरेज या सिंचन प्रकल्पाची कामे प्रगतीपथावर आहे.
(३) अमरावती प्रदेशांतर्गत खारपाण पट्ट्यातील अथवा खारपाणपट्ट्यास लाभदायक ४ मध्यम (पेढी बॅरेज, घुंगशी बॅरेज, पूर्णा व नेरधामणा आणि उमा बॅरेज) व २ बृ.ल.पा. (कवठा बॅरेज आणि काटीपाटी बॅरेज) आहेत. यापैकी कवठा बॅरेज प्रकल्प पूर्ण झाला असून, घुंगशी बॅरेज अंशत: पूर्ण झालेला आहे. पूर्णा बॅरेज, नेरधामणा प्रकल्पामध्ये पाणीसाठा निर्मिती झाली असून पेढी बॅरेज प्रकल्पाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. उमा बॅरेज आणि काटीपाटी बॅरेज प्रकल्पाचे सु.प्र.मा.

मान्यतेच्या प्रक्रियेत असून उमा बॅरेजचे काम अंशत: झालेले असून काटीपाटी बॅरेजच्या बांधकामास अद्याप सुरवात झालेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्ह्यात औषधीयुक्त वनउपज खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत

**(३१) ६०९९३ (२१-०४-२०२३). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी, दुर्गम व जंगलव्याप्त नागरीक मोहफुल, हिरडा, आवळा, बेहडा, चार, बोर व औषधीयुक्त अन्य वनउपज गोळा करुन उदरनिर्वाह करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नागरीकांनी गोळा केलेले वनउपज शासकीय खरेदी केंद्र नसल्याने खाजगी व्यापाऱ्यांना अत्यल्प दरात विक्री करावे लागत असल्याने त्यांना मोठे नुकसान सोसावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार औषधीयुक्त वनउपज शासकीय खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१८-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) अशा प्रकारची कोणतीच तक्रार संबंधित प्रकल्प कार्यालय स्तरावर प्राप्त झालेली नाही.
(३) गडचिरोली /अहेरी/भामरागड या तिन्ही प्रकल्प कार्यालयाच्या क्षेत्रांतर्गत औषधीयुक्त वनउपज शासकीय खरेदी केंद्र सुरु करण्याची बाब विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सासोली (ता.दोडामार्ग,जि.सिंधुदुर्ग) येथील मागील अनेक वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या सबस्टेशनची झालेली दुरावस्थेबाबत

**(३२) ६१०८० (०३-०५-२०२३). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सासोली (ता.दोडामार्ग,जि.सिंधुदुर्ग) येथील मागील अनेक वर्षांपासून अस्तित्वात असलेले सबस्टेशन तसेच अधिकारी व कर्मचा-यांना राहण्यासाठी उभारण्यात आलेली इमारत तसेच परिसराची अत्यंत दुरावस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोट्यावधी रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या सबस्टेशनकडे महावितरण अधिका-यांचे दुर्लक्ष झाल्याने तसेच अधिकारी व कर्मचारी यांना राहण्यासाठी उभारण्यात आलेल्या इमारतीही वापराविना पडून असल्याने निवासस्थानांची दुरावस्था होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू सबस्टेशनच्या दुरावस्थेबाबत वीज ग्राहकांनी मागील ३ वर्षांपासून कार्यकारी अभियंता, वीज वितरण कंपनी, सावंतवाडी यांच्याकडे लेखी तक्रार करून सुधारणा करण्याची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने महावितरण कंपनीच्या संबंधीत अधिका-यांनी कार्यवाही करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.
सासोली सबस्टेशनची इमारत सुस्थितीत असून सासोली (ता.दोंडामार्ग, जि. सिंधुदुर्ग) येथील कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी उभारण्यात आलेल्या इमारतीमध्ये सद्या कोणीही राहत नाही. तथापि, तेथील परिसर स्वच्छ व सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.
सासोली उपकेंद्र चालू स्थितीत आहे व इमारत सुस्थितीत आहे.
(३) हे खरे नाही.
स्थानिक लोक प्रतिनिधींचे सबस्टेशन किंवा निवासस्थानाच्या इमारतीच्या दुरावस्थेबाबत लेखी तक्रारी/निवेदने प्राप्त झालेली नाहीत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सुधारित सर्वसमावेशक असणाऱ्या आर्थिक मर्यादेत वाढ करण्याबाबत**

**(३३) ६१२५४ (१४-०६-२०२३). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नियोजन विभागाच्या १२ जुलै २०१६ च्या शासन निर्णयानुसार आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सुधारित सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना प्रकरण क्रमांक ३ मधील ३.२८.४ नुसार व्यायामशाळेसाठी १०.०० लक्ष इतक्या आर्थिक मर्यादेत व्यायामशाळेचे बांधकाम करण्यात यावे असे निर्देश दिलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बांधकाम साहित्याची राज्य दरसूची (SSR) दर वर्षी बदलत असते व यामध्ये साहित्यांची किंमत ५ ते ७% वाढत असून शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून आजपर्यंत बांधकाम साहित्याच्या राज्य दर सूचीमध्ये जवळपास ३५ % वाढ झालेली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील शासन निर्णयानुसार व चालू वर्षीच्या बांधकाम साहित्याच्या राज्य दरसुचिनुसार व्यायामशाळेचे १०.०० लक्ष इतक्या आर्थिक मर्यादित बांधकाम करणे शक्य होत नाही, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त आर्थिक मर्यादा वाढविण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (१८-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) अंशत: खरे आहे. दरवर्षी बांधकाम साहित्याच्या वाढणा-या किंमती तसेच मजुरी त्याचप्रमाणे वाहतुक व त्यासाठी लागणारे इंधन इ. बाबी (Price index ) नुसार राज्य दरसुची मध्ये बदल होत असतो. तसेच,व्यायाम शाळेच्या बांधकामाचे क्षेत्रफळ किती आहे त्यानुसार अंदाजपत्रक तयार करण्यात येते व त्या वर्षीच्या राज्य दरसूची नुसार बांधकामाची रक्कम निश्चित करण्यात येते. त्यामुळे रु.१०.०० लक्ष इतक्या आर्थिक मर्यादेत बांधकाम करणे शक्य आहे किंवा कसे हे संबधित बांधकामाचे क्षेत्रफळ /नकाशे नुसार कमी जास्त असू शकते. त्याचप्रमाणे या कार्यक्रंमातर्गत अनुज्ञेय असलेल्या कमाल आर्थिक मर्यादेपेक्षा जास्त रकमेच्या बाबींना/कामांना "विशेष बाब "म्हणून शासन स्तरावर मंजूरी देण्याचे प्रावधान आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यात गर्भलिंग निदान व गर्भपात करणा-यास आळा घालण्याबाबत

**(३४) ६१२६५ (३०-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी व भुदरगड तालुक्यात अवैध गर्भलिंग निदान व गर्भपात करणा-यांवर दि.१९ जानेवारी, २०२३ रोजी पोलिसांनी छापा टाकून कारवाई केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांमध्ये गर्भलिंग निदान व गर्भपात करणा-या टोळ्या राजरोसपणे कार्यरत असल्याने गर्भपातास आळा घालण्याच्यादृष्टिने प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासंदर्भात कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) होय.

(२)

अ) वैद्यकीय शिक्षण अगर वैद्यकीय व्यवसाय करण्याची पदवी अथवा परवानगी नसताना बेकायदेशीररित्या वैद्यकीय व्यवसाय तसेच गर्भलिंग निदान चाचणी करत असल्याचे मुद्देमालासह मिळून आल्याने पंचायत समिती, भुदरगडचे तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्या फिर्यादीवरून भुदरगड पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गु.र.नं. १५/२०२३ अन्वये महाराष्ट्र वैद्यक व्यवसाय अधिनियम,१९६१ चे कलम ३३ सह वैद्यकीय गर्भपात अधिनियम,१९७१ चे कलम ३, ४, ५ सह महाराष्ट्र शुश्रुषा गृह नोंदणी अधिनियम,१९४९ चे कलम ५, ६ प्रमाणे दि.१७/०१/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये आरोपी क्र. १ यास अटक करुन ताब्यात मिळालेल्या मोबाईलच्या आधारे आजतागायत एकुण ९ आरोपींना अटक करण्यात आले आहे. गुन्ह्यातील सर्व आरोपीं न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत. गुन्ह्याचे तपासामध्ये निष्पन्न झालेल्या बाबींवरुन गुन्ह्यास वाढीव भा.द.वि. कलम ४१९, ४२०, ३१२, ३१५, २०१, ३४ ही वाढीव कलमे लावण्यात आली आहेत. सदरच्या गुन्ह्याचा पुढील तपास सूरू आहे.

ब) वैद्यकीय शिक्षण अगर वैद्यकीय व्यवसाय करण्याची पदवी अथवा परवानगी नसताना बेकायदेशीररित्या वैद्यकीय व्यवसाय तसेच गर्भलिंग निदान चाचणी करत असल्याचे मुद्देमालासह मिळुन आल्याने पंचायत समिती, राधानगरीचे तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्या फिर्यादीवरुन राधानगरी पोलीस ठाणे, कोलहापूर येथे गु.र.नं. ११/२०२३ अन्वये महाराष्ट्र वैद्यक व्यवसाय अधिनियम १९६१ चे कलम ३३ सह महाराष्ट्र शुश्रुषा गृह नोंदणी अधिनियम १९४९ चे कलम ५, ६ प्रमाणे दिनांक १८/०१/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये ३ आरोपीस अटक करुन ताब्यात मिळालेल्या मोबाईलच्या आधारे आजतागायत एकुण १८ आरोपीं निष्पन्न झाले आहेत. यामधील १४ आरोपींना अटक करण्यात आले असून ४ आरोपी अद्याप फरार आहेत. गुन्ह्यातील अटक १४ आरोपीं न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत. गुन्ह्याचे तपासामध्ये निष्पन्न झालेल्या बाबींवरुन गुन्ह्यास वाढीव भा.द.वि. कलम ३१५, ४१९, ३४ सह वैद्यकिय गर्भपात अधिनियम १९७१ चे कलम ३,४,५ प्रमाणे ही वाढीव कलमे लावण्यात आली आहेत. सदरचा गुन्ह्याचा पुढील तपास सूरू आहे.

(३) गर्भलिंग व गर्भपात करणे हा कायदेशीर गुन्हा असलेबाबत व निदर्शनास आल्यास पोलीस ठाणे व पोलीस नियंत्रण कक्ष येथील १०९१ व ११२ हेल्पलाईन नंबर वर तक्रार करणेबाबतचे कोल्हापूर जिल्हयातील बस स्थानके, शासकिय कार्यालये तसेच चित्रपटगृहे इत्यादी ठिकाणी फलक लावून प्रबोधन केले जाते. जिल्हयातील प्रत्येक पोलीस ठाणेस निर्भया पथकाची स्थापना करण्यात आलेली असून महिलांच्या तक्रारीचे अनुषंगाने दिवस रात्र हद्दीमध्ये पेट्रोलींग तसेच शाळा, कॉलेज, सार्वजनिक ठिकाणी, महिलांचे कार्यक्रमाचे ठिकाणी जावून महिलांच्या तक्रारीबाबत समोपदेशन केले जाते. तसेच गर्भलिंग व गर्भपातबाबत पोलीसांत तक्रार देणेबाबत आव्हान केले जात आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

### भुसावळ शहरातील खडका महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ (एम् आय डी सी) प्लॉट न १३४ मधील एका कंपनीत बायो-डीझेल तयार केले जात असल्याबाबत

**(३५) ६१२७८ (२७-०४-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ शहरातील खडका महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ (एम् आय डी सी) प्लॉट न १३४ मधील एका कंपनीत बायो-डीझेल तयार केले जाते असल्याच्या संशयावरून तालुका पोलिसांनी दिनांक २२ जानेवारी २०२३ रोजी दोन टँकर व दोन कामगारांना ताब्यात घेतले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्वलनशील पदार्थांचे नमुने तपासणीसाठी मुंबईला पाठविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या व्यक्ती वर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२३) :** (१) व (२) होय,

सदर गुन्ह्यातील बायोडिझेलचे नमुने तहसील कार्यालय, भुसावळ मार्फत तपासणीसाठी, राज्य समन्वयक (पेट्रोलियम व प्राकृतीक गॅस), महाराष्ट्र शासन यांचेकडे पाठविण्यात आलेले आहेत.
(३) व (४) सदर प्रकरणी तालुका पोलीस स्टेशन, भुसावळ पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.११/२०२३ भा.दं.वि कलम २८५, २८७, ३३६, ३४ तसेच जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ३ व ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
सदर प्रकरणी एकुण सुमारे १ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सदर प्रकरणाचा पुढील तपास सरु आहे.
(५) विलंब झालेला नाही.

---

### नांझा (ता.कळंब जि.यवतमाळ) येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेच्या वसतीगृहाची नविन इमारत बांधण्याबाबत

**(३६) ६१३३० (०८-०५-२०२३). डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांझा (ता.कळंब, जि.यवतमाळ) येथील प्रकल्प कार्यालय पांढरकवडा (ता.केळापूर) अंतर्गत येत असलेली नांझा शासकीय आदिवासी आश्रमशाळेमध्ये पहिली ते बारावी पर्यंत ३९६ विदयार्थी शिक्षण घेत आहेत तथापी शाळेच्या वसतीगृहाचे बांधकाम (स्ट्रकचर) हे सातवी पर्यंत विदयार्थीकरीता असुन तेथे नविन बांधकाम झाले नसल्याने मुलांना राहण्याची गैरसोय होत असल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकल्प कार्यालय, पांढरकवडा मार्फत शाळेची दुरुस्ती करण्यात येते परंतु नवीन वसतीगृहाचे बांधकाम करण्यात आले नसल्यामुळे विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था होत नसल्याने ते डेस्कॉलर विदयार्थी म्हणून शाळेमध्ये राहत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्प कार्यालयअंतर्गत येत असलेल्या शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये वर्ग वाढ झाली परंतू शाळेचे बांधकाम ( स्ट्रकचर) जुने असल्याचे निदर्शनास येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नांझा शासकीय आदिवासी आश्रमशाळाचे वसतीगृह बांधकाम करण्याचे आदेश देण्यात आले आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (१८-०७-२०२३) :**
(१) व (२) अंशत : खरे आहे.
प्रकल्प कार्यालय पांढरकवडा ता. केळापूर अंतर्गत नांझा शासकीय आदिवासी आश्रमशाळेमध्ये इयत्ता पहिली ते बारावी मध्ये ३९६ विदयार्थी प्रवेशित असून त्यापैकी १२३ विद्यार्थी निवासी आहेत व उर्वरित २७० विद्यार्थी डेस्कॉलर आहेत. हे डेस्कॉलर विद्यार्थी नजीकच्या गावातील असून मानवविकास कार्यक्रमांतर्गत त्यांना शाळेत नेण्या-आणण्याकरिता बससेवा उपलब्ध आहे.
नांझा आश्रमशाळेत सध्यस्थितीत विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था बहुउद्देशीय सभागृहात करण्यात आली आहे. तसेच मुलींच्या राहण्याची व्यवस्था स्वतंत्र तीन रुममध्ये करण्यात येत आहे. मुलींच्या वसतीगृहाला स्वतंत्र वॉलकंपाऊंड आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होत नाही.
(३) व (४) नांझा ता. कळंब, जि. यवतमाळ येथील शासकीय आश्रमशाळेचे बांधकाम जुने आहे ही वस्तूस्थिती आहे. मात्र आता नवीन इमारत बांधकाम करण्याकरीता दिनांक ३ जुलै, २०२३ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवगांव, मुरंबी, देवडोगर (ता. इगतपुरी- त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथील शासकीय आश्रमशाळांना नविन इमारती मंजूर करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३७) ६१५२८ (०८-०५-२०२३). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इगतपुरी- त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यातील देवगांव, मुरंबी, देवडोगर, येथील शासकीय आश्रमशाळांना नविन इमारती मंजूर करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन दिल्याचे दिनांक १ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर आश्रमशाळांना नविन इमारतींसाठी तातडीने निधी उपलब्ध करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१८-०७-२०२३) :** (१) होय.
(२) शासकीय आश्रमशाळा देवडोंगरा, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक येथे शालेय इमारत बांधकामासाठी व शासकीय आश्रमशाळा देवगांव, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक येथे मुलींचे वसतीगृह (G+३) इमारतीचे बांधकामासाठी दिनांक ३ जुलै, २०२३ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच शासकीय आश्रमशाळा मुरंबी, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक येथे शासकीय आश्रमशाळा नवीन इमारतीचे बांधकाम पुढील अर्थसंकल्पात समाविष्ट करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील टेमघर धरणाच्या दुरुस्तीबाबत**

**(३८) ६१५६३ (०८-०५-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील टेमघर धरणामधून मोठ्या प्रमाणावर होत असलेली पाणी गळती रोखण्यासाठीच्या प्रभावी उपाययोजनेचे काम प्रगतीपथावर आहे हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी आखलेल्या योजनेचे सर्वसाधारण स्वरूप आणि अपेक्षित खर्चाचा तपशील काय आहे,
(३) असल्यास, पाणी गळती १०० टक्के बंद होण्यासाठी किती कालावधी लागणे अपेक्षित आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) टेमघर धरणातील गळतीच्या कारणांचा अभ्यास करुन उपाययोजना सुचविण्यासाठी श्री. वि. म. रानडे, निवृत्त सचिव (जलसंपदा विभाग) यांचे अध्यक्षतेखाली टेमघर धरण तज्ञ समिती (TDEC) गठीत केली होती. सदर समितीने धरणाची पाहणी करून १) अल्पकालीन गळतीप्रतिबंधक उपाययोजना २) दिर्घकालीन धरण मजबुतीकरण उपाय योजना अशा दोन भागात दुरूस्ती कामे सुचविली होती. समितीने सुचविल्याप्रमाणे अल्पकालीन गळती प्रतिबंधक उपाययोजनांची कामे आपत्कालीन परिस्थितीत सन २०१७ मध्ये हाती घेण्यात आली होती. या कामासाठी एकुण रु.२५२.६६ कोटी खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी रु.१०१.५१ कोटी खर्च करण्यात आला आहे.
(३) टेमघर धरणातून सन २०१० पासून गळती सुरु असल्याचे निदर्शनास आले होते. सन २०१६-१७ मध्ये गळतीचे प्रमाण २५८७ लीटर प्रति सेकंद एवढे होते. सदर गळती प्रतिबंधक कामे हाती घेतल्यानंतर गळतीच्या प्रमाणात लक्षणीय घट (९३ %) होवून हे प्रमाण १९७ लीटर प्रति सेकंद एवढे आढळून आले. सदर प्रकरणी पाणी गळती १००% बंद होण्यासाठी सुधारीत प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कराड (जि.सातारा) येथील शासकीय औषध निर्माण करणाऱ्या महाविद्यालयाचा प्रबंधकानी केलेला गैरव्यवहार

**(३९) ६१७११ (३०-०४-२०२३). श्री.महेश शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कराड (जि.सातारा) येथील शासकीय औषध निर्माण महाविद्यालयाचा प्रबंधक दिलीप कांबळे यांच्या विरोधात लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे दिनांक ९ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास मुंबई येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार संबधित दोषी अधिका-यावर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३)
I.अर्जदार श्री. अजित फारीद पठान, फातिमानगर, सोलापूर यांच्या नावाने दिनांक ०९/१२/२०२१ रोजी महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांच्या कार्यालयास तक्रार अर्ज प्राप्त झालेला होता. त्याअनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांच्या कार्यालयाने श्री. दिलीप कांबळे यांचेविरुध्दच्या आक्षेपांची पडताळणी करुन अहवाल सादर करणेबाबत आदेशित केले होते.
II.त्याप्रमाणे तत्कालीन चौकशी अधिकारी पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा यांनी सखोल चौकशी केली असता अर्जात असलेल्या आक्षेपांमध्ये काहीही तथ्य आढळुन आलेले नाही. अर्जदार यांनी नमूद केलेल्या पत्त्यावर संपर्क केला असता ते मिळून आलेले नाहीत.
III.तसेच सदर प्रकरणी चौकशी अधिकारी यांनी अर्जदार मिळून न आल्याने व आक्षेपांमध्ये तथ्य आढळून न आल्याने सदर अर्ज दफ्तरी फाईल होणेबाबत महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांना पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्फतीने शिफारशीसह अहवाल सादर केला होता. त्यास अनुसरुन सदरचा अर्ज दफ्तरी दाखल करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हा विकास आराखडा तयार करण्याबाबत

**(४०) ६१७७८ (३०-०४-२०२३). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्थानिक स्तरावर रोजगार व उत्पन्नाला चालना देण्याच्या दृष्टीने जिल्हा विकासाचा आधार तसेच गतीमान अर्थव्यवस्था या विषयासंदर्भात जिल्हास्तरीय बैठकांचे आयोजन करावे असे राज्याचे मुख्य सचिव यांनी प्रशासनाला निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, या निर्देशानुसार शासनाने सदर बैठकांचे आयोजन करुन समग्र जिल्हा विकास आराखडे तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (०५-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे

(२) व (३) निती आयोगाने दिनांक २०/१२/२०२२ रोजी "District as a fulcrum of Development" या विषयाच्या अनुषंगाने सर्व राज्यांची V.C. द्वारे एक कार्यशाळा आयोजित केली होती. त्या अनुषंगाने राज्याचे मुख्य सचिव यांनी दिनांक ०३/०१/२०२३ रोजी "जिल्हा विकासाचा आधार व गतिमान अर्थव्यवस्था" या विषयाच्या अनुषंगाने राज्यातील सर्व जिल्ह्यांची V.C. द्वारे एक बैठक घेतली आहे. तद्नंतर मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन यांच्या स्तरावरुन जिल्हा विकास आराखडा (District Strategic Plan) तयार करण्याबाबत मार्गदर्शक सूचना दिनांक २८/०३/२०२३ च्या पत्रान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे नियोजन विभागाच्या दिनांक २०/०४/२०२३ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा विकास आराखडा तयार करण्यासाठी जिल्हा तसेच राज्यस्तरावर विविध समित्यांचे गठन करण्यात आले आहे. तसेच दिनांक २५/०४/२०२३ रोजी मा.मुख्यमंत्री आणि मा.उपमुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या परिषदेमध्ये याबाबत सर्वांना मार्गदर्शन करण्यात आले. जिल्हा विकास आराखडा तयार करण्याचे काम जिल्हास्तरावर सुरु करण्यात आले आहे.

---

## मुंबई-अहमदाबाद महामार्गावर असलेल्या धाब्यावर लोखंडी सळई आणि लिक्विड पॅराकीन इंधनाचा काळाबाजार होत असल्याबाबत

**(४१) ६१८४८ (३०-०४-२०२३). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद महामार्गावर असलेल्या एका धाब्यावर लोखंडी सळई आणि लिक्विड पॅराकीन इंधनचा काळाबाजार सुरु असल्याचा प्रकार पालघरचे तहसलीदार यांनी केलेल्या कारवाईमध्ये माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गावरील छोट्या-मोठ्या ढाब्यांवर रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात अवैध धंदे सुरु असून त्याकडे स्थानिक पोलीसांचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन अवैध धंदे करणाऱ्यांवर व त्यांना पाठिशी घालणाऱ्यां संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

तथापि, दि. ३१/०१/२०२३ रोजी तहसिलदार, पालघर आणि पोलीस ठाणे, मनोर यांच्या संयुक्त कारवाईमध्ये मुंबई - अहमदाबाद महामार्गावर असलेल्या अमन धाब्यावर ज्वलनशील द्रव पदार्थाची साठवणूक व विक्री होत असल्याचे आढळून आले. त्याबाबत मनोर पोलीस ठाणे, पालघर येथे दि. ०१/०२/२०२३ रोजी गु.र.क्र. १६/२०२३ भा.दं.वि. कलम २८५, ३४ सह जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ चे कलम ३ व ७ अन्वये तीन आरोपींविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर तिन्ही आरोपींविरुध्द मा. न्यायालयात दोषारोप दाखल करण्यात आले आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

महामार्गावरील अवैध धंद्यावर आळा बसावा याकरिता पोलीस वाहनाने पेट्रोलिंग करण्यात येते. दरम्यान काही अनुचित प्रकार आढळून आल्यास तात्काळ कारवाई करण्याबाबत उप विभागीय पोलीस अधिकारी व प्रभारी अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

पालघर पोलीस घटकात डिझेल /रासायनिक द्रव्य तसेच लोखंडी सळई साठवणूक व विक्री प्रकरणी खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

| सन २०२२ | छापे | जप्त मुद्देमाल |
|---|---|---|
| डिझेल /रासायनिक द्रव्य | १२ | रु.८८.१७ लाख |
| लोखंडी सळई | ०२ | रु.९.६५ लाख |

| सन २०२२ | छापे | जप्त मुद्देमाल |
|---|---|---|
| डिझेल /रासायनिक द्रव्य | ०७ | रु.१.७१ लाख |

अशा अवैध धंद्यांना सहकार्य करण्यात पोलीस अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याचे आढळून आले नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्धवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ओढांगी खारभुमी बंधारा (ता.पेण, जि. रायगड) नॉनप्लॅनमधून प्लॅन मध्ये घेणेबाबत**

**(४२) ६१८८५ (०८-०५-२०२३). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील ता.पेण मधील ओढांगी खारभुमी बंधारा भरतीच्या पाण्यामुळे अस्तित्वातच राहीलेला नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंधारा अस्तित्वात नसल्यामुळे समुद्राच्या भरतीचे पाणी गावात घुसून भातशेतीचे मोठया प्रमाणावर नुकसान होत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बंधारा त्वरीत नॉन प्लॅनमधून प्लॅनमध्ये घेतल्यास संबंधित गावकऱ्यांना दिलासा मिळू शकेल हे खरे आहे काय,

(४) असल्यास, होत असलेले नुकसान टाळण्याकरीता व गावकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टिकोनातून सदर बंधारा नॉनप्लॅनमधून प्लॅन मध्ये घेण्याकरीता काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.

सदर योजनेचे नुतनीकरण होऊन १२वर्षे इतका कालावधी लोटला आहे. या योजनेचा बांध कमकुवत झाला असून उघाड्या नादुरुस्त झाल्या आहेत. रायगड जिल्ह्यातील अतिवृष्टी व येणारी उधाणे यामुळे उघाडीचे दरवाजे तुटून तसेच कमकुवत बांधाला खांडी जाऊन भातशेतीत पाणी घुसण्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत.

(३) व (४) योजनेचे नुतनीकरण होऊन १२ वर्षांचा कालावधी झाला असून शासन निर्णय खाभूयो २०१९/(३०/२०१९)/खारभूमी, दिनांक ०४.०३.२०२२ नुसार खारभूमी योजनांचे पुन:श्च नुतनीकरण करण्यासाठी नुतनीकरणापासून १५ वर्षाचा कालावधी होणे आवश्यक आहे. सबब, सद्य:स्थितीत सदर योजना ४४०२ ०३८४ राज्यनिधी या प्लॅन लेखाशिर्षांतर्गत नुतनीकरणासाठी प्रस्तावित केली जाऊ शकत नाही. आवश्यकतेनुसार वाशी

ओढांगी खारभूमी योजनेवर नॉनप्लॅन मध्ये तातडीची कामे करण्यात येत आहेत व शेतीत पाणी घुसणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे. २४०२-०५०४ विस्तार व सुधारणा या लेखाशिर्षाखाली उपलब्ध निधीनुसार सन २०२३-२४ च्या प्रापणसूचीत सदर बांधाच्या व उघाडीच्या दुरुस्तीच्या कामांचा समावेश करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे पुनर्गठित करुन विदर्भ व मराठवाडयातील अनुशेष दुर करण्याबाबत

**(४३) ६१९०५ (२६-०४-२०२३). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे पुनर्गठित करणे आणि त्यांना वैधानिक विकास मंडळे संबोधण्यात यावे यासाठी मंत्रिमंडळ निर्णयानुसार दिनांक २८ ऑक्टोबर, २०२२ च्या अर्ध शासकीय पत्रान्वये तीनही विकास मंडळे पुनर्गठित करण्याबाबत केंद्रशासनाकडे पत्रव्यवहार करुनही केंद्राकडून मान्यता देण्याबाबत कोणताही निर्णय झाला नसल्याची बाब दिनांक ४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) अन्वये विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांच्या क्षेत्रास विकास खर्चाकरिता निधीचे मा. राज्यपालांच्या सन २००२ च्या निदेशानुसार अद्यापपर्यंत विभाज्य निधी वाटप विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ क्षेत्रात अनुक्रमे २३.०३%, १८.७५% व ५८.२३%या प्रमाणात करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सन २०१४ ते सन २०१९ पर्यंत विदर्भ, मराठवाडा व उर्वरीत महाराष्ट्राचे अनुशेष भरण्यासाठी किती निधीची तरतुद करण्यात आली, किती निधी वितरीत करण्यात आला,
(४) असल्यास, मराठवाडयाच्या विकासासाठी सिंचन विभागाचा ३५ हजार कोटी तसेच रस्ते, शिक्षण, कृषी, ऊर्जा, पाणीपुरवठा, सार्वजनिक बांधकाम विभाग या विभागाचा एकूण ८० हजार कोटी रुपयांचा अनुशेष देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने शासनाने विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे पुनर्गठित करण्यासाठी केंद्रशासनाकडून मंजुरी मिळवून विदर्भ व मराठवाडयातील सिंचन, रस्ते, शिक्षण, कृषी, ऊर्जा, पाणीपुरवठा, सार्वजनिक बांधकाम विभागांच्या कामांना पुर्वीप्रमाणे विशेष निधी उपलब्ध करुन अनुशेष दुर करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (०२-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही, मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक २८.१०.२०२२ च्या अर्धशासकीय पत्रान्वये मा.गृहमंत्री, भारत सरकार यांना तीनही विकास मंडळे पुनर्गठित करण्याची विनंती करण्यात आली आहे. त्यासंदर्भात मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाकडून केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर प्रकरणी केंद्राकडून मान्यता देण्याबाबत कोणताही निर्णय झाला नसल्याची बाब दिनांक ०४.०१.२०२३ वा त्यासुमारास निदर्शनास आलेली नाही.
(२) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ (२) अन्वये विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांच्या क्षेत्रास विकास खर्चाकरिता निधीचे मा. राज्यपालांच्या सन २००२ च्या निदेशानुसार अद्यापपर्यत विभाज्य निधी वाटप विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ क्षेत्रात अनुक्रमे २३.०३%,१८.७५% व ५८.२३% या प्रमाणात करण्यात येते.
(३) भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३७१(२) मधील तरतूदीनुसार मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्यावर सबंध राज्याच्या गरजा साकल्याने विचारात घेऊन तीन ही क्षेत्रात विकास खर्चाकरीता निधीचे समन्यायी वाटप करण्याची विशेष जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्या अनुषंगाने मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांनी विहित केलेल्या सुत्रानुसार वार्षिक

योजनेतील विभाज्य नियतव्ययाचे वाटप करण्यात येते. विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र क्षेत्रात सन २०१४ ते सन २०१९ या कालावधीत वर्षनिहाय विभाज्य निधी वाटप व प्रत्यक्ष वितरीत निधी व अविभाज्य निधी यांची माहिती खालील तक्त्यात देण्यात येत आहे:

(रु.कोटीत)

| सन | एकूण निधी | विभाज्य निधी | प्रदेशनिहाय वितरीत विभाज्य निधी | | | अविभाज्य निधी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | विदर्भ | मराठवाडा | उर्वरित महाराष्ट्र | |
| २०१४-१५ | ६३५६०.१२ | ४०७५७.९९ | ११११४.८२ | ६९९२.६३ | २२६६४.५४ | २२८०२.१३ |
| २०१५-१६ | ६८७६२.४८ | ४६४०७.४० | १३६०२.८१ | ८३२२.३६ | २३२०३.२५ | २२३५५.०८ |
| २०१६-१७ | ७१३२९.४२ | ४०२८८.९५ | १३९७७.६५ | ८९०५.५० | २४४०५.८० | २४०४०.४७ |
| २०१७-१८ | १२८७६७.३३ | ५५५२१.२७ | १४८३८.९५ | १०६४७.५४ | ३००३४.७९ | ७३२४६.०६ |
| २०१८-१९ | १२१७०३.५६ | ६६७९७.३८ | १८०३२.०५ | १२५३३.८९ | ३६२६६.२२ | ५४९०६.१८ |
| २०१९-२० | १५२७६०.१५ | ८२६५१.४५ | २१८५८.९३ | १६४४९.१५ | ४४३४३.३७ | ७०१०८.७० |

(४) हे खरे नाही. निर्देशांक व अनुशेष समितीने दिनांक ०१.०४.१९९४ रोजी मराठवाड्याचा सिंचन क्षेत्रासह वित्तीय अनुशेष रु.४००४.५५ कोटी निश्चित केला होता. तो अनुशेष दूर झालेला आहे. तसेच मराठवाड्याचा सिंचनाचा भौतिक अनुशेष ४३०६४० हेक्टर रब्बी समतुल्य निश्चित केला होता. त्यापैकी ९८ टक्के म्हणजे ४२२७३० हेक्टर रब्बी समतुल्य अनुशेष दूर करण्यात आला आहे. तद्नंतर दि.१/४/२००० रोजी अनुशेष परिगणित करण्यात आला. सदर परिगणित अनुशेषानुसार मराठवाडयाचा सिंचन क्षेत्रातील वित्तीय अनुशेष रु.२१७३.९६ कोटी असून अन्य १० विकास क्षेत्रातील वित्तीय अनुशेष रु.१३७३.१० कोटी होता. सन २००० नंतर प्रदेशनिहाय अनुशेष परिगणित करण्यात आलेला नाही. मा.मुख्यमंत्री महोदयांनी महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२२ च्या तृतीय अधिवेशनात दिनांक २९.१२.२०२२ रोजी जाहीर केल्यानुसार विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाचे पुनर्गठन झाल्यानंतर राज्यातील विविध प्रदेश आणि क्षेत्रामध्ये असंतुलता शोधणे आणि राज्यामध्ये समतोल प्रादेशिक विकास साधण्यासाठी मार्ग सुचविण्यासाठी समिती स्थापन करण्यात येईल. सदर समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने निर्णय घेण्यात येईल.

(५) मा.राज्यपालांच्या निदेशानुसार सन २०११-१२ पासून विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या तीनही विकास मंडळांना देण्यात येणारा विशेष निधी बंद करण्यात आला आहे. अपवादात्मक बाब म्हणून सन २०१४-१५ व सन २०१९-२० या वर्षात मा.राज्यपालांच्या मान्यतेने राज्यातील १२५ तालुके व ४५ “क” वर्ग नगरपालिका क्षेत्रांमधील मानव विकास निर्देशांक वृध्दींगत होण्याच्या दृष्टीने विकास मंडळांना विशेष निधी देण्यात आला आहे. वरील (४) येथे नमूद केल्यानुसार राज्यातील विविध प्रदेश आणि क्षेत्रामध्ये असंतुलता शोधणे आणि राज्यामध्ये समतोल प्रादेशिक विकास साधण्यासाठी मार्ग सुचविण्यासाठी स्थापन करण्यात येणाऱ्या समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने शासनस्तरावर निर्णय घेण्यात येईल. विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र ही तीनही विकास मंडळे संपुष्टात आली असली तरी, वार्षिक

योजनेतील विभाज्य निधीचे वाटप वरील (२) येथे नमूद मा. राज्यपालांच्या विहीत सुत्राप्रमाणे विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र प्रदेश निहाय करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पेण (जि.रायगड) तालुक्यातील गावामध्ये मेरीटाईम बोर्डाकडून जेटी व प्रवासी निवारा शेड बांधण्याबाबत**

**(४४) ६१९०९ (०८-०५-२०२३). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्राम पंचायात शिर्की, वरेडी, जिते, रावे, दादर, सोनखार, कळवा, वडाव, वाशी, कोलेटी व निगडे येथे मेरीटाईम बोर्डाकडून जेटी व प्रवासी निवारा शेड बांधणेकरीता लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ११ सप्टेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन नविन आराखडयात सामाविष्ट जेटी व प्रवासी शेड बांधण्याकरीता निधी मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (२८-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदरहु कामे ही ‘तरंगती जेट्टी व तत्सम प्रवासी सुविधा निर्माण करणे’ या योजनेंतर्गत सन २०२३-२४ या वित्तीय वर्षामध्ये प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.
तद्नंतर निधी उपलब्धतेनुसार कामांना प्रशासकीय मान्यता घेण्याचे व निविदा प्रक्रियेअंती कामांची अंमलबजावणी करण्याचे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नंदुरबार व तळोदा येथील प्रांताधिकारी यांचेकडे प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प) पदाचा अतिरीक्त पदभारअसल्याबाबत.**

**(४५) ६१९२४ (२५-०४-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार व तळोदा येथील प्रांताधिकारी यांच्याकडे प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प) पदाचा अतिरीक्त कार्यभार असल्यामुळे ग्रामीण जनतेला आपल्या कामासाठी वारंवार फे-या माराव्या लागत असून आदिवासी व इतर लोकांमधे कामातील दिरंगाई होण्याच्या कारणास्तव असंतोष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तळोदा प्रकल्पाकडे धडगांव, तळोदा, अक्कलकुवा तर नंदुरबार प्रकल्पामधे नवापूर, नंदुरबार व शहादा हे आदिवासी बहूल लोकवस्तीचे तालुके असल्यामुळे आदिवासींच्या अनेक योजना, वैयक्तीक लाभाच्या योजना तसेच शासकीय आश्रमशाळेचा कारभार असल्यामुळे या अधिकाऱ्यांकडे अतिरीक्त पदभार असल्यामुळे प्रभारी पदावर जनतेची कामे होत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने आदिवासी जनतेची कामे तातडीने होण्यासाठी या दोन प्रकल्पांमधे स्वतंत्र अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (११-०७-२०२३) : (१)** हे खरे नाही.
या संदर्भात नंदुरबार व तळोदा प्रकल्प कार्यालयाकडे कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) हे खरे नाही

(३) लोकप्रतिनीधींकडून प्राप्त मागण्यांच्या अनुषंगाने, आदिवासी विकास विभागातील ११ अतिसंवेदनशील प्रकल्प कार्यालयांकरीता पूर्णवेळ व अनुभवी भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी देण्याबाबत सामान्य प्रशासन विभागास विनंती करण्यात आली होती. तथापि, सदर विनंती मान्य करता येणार नाही असे सामान्य प्रशासन विभागाने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिशोर (ता. कन्नड, जि. संभाजीनगर) येथील पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे सुरु असल्याबाबत**

**(४६) ६२०६५ (३०-०४-२०२३). श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिशोर (ता.कन्नड, जि. संभाजीनगर) येथील पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे सुरु असून हे अवैध धंदे तात्काळ बंद करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०२२, मध्ये वा त्यादरम्यान पोलिस यंत्रणेबरोबर बैठक घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बैठकीत अवैध धंदे तात्काळ बंद करण्याच्या सूचना देऊनही अद्यापपर्यंत अवैध धंदे बंद करण्याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, पिशोर पोलिस ठाण्याच्या हद्दीत सुरु असलेले अवैध धंदे बंद करण्यासंदर्भात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) होय.
(२) व (३)
प्रस्तुत प्रकरणी पोलीस दलाकडून अवैध धंद्यांवर कार्यवाही करण्याबाबत झालेल्या चर्चेनूसार पिशोर पोलीस स्टेशन अंमलदार मार्फत प्रत्येक महिन्याच्या बैठकीमध्ये वेळोवेळी विशेष मोहिम राबवून अवैध धंद्याचे समुळ उच्चाटन करणेबाबत सूचना देऊन त्यानूसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) पिशोर पोलीस ठाणे हद्दीत माहे डिसेंबर, २०२२ ते एप्रिल, २०२३ मध्ये अवैध धंद्याबाबत केलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे :-

| अवैध धंदे | दाखल गुन्हे | जप्त मुद्देमाल (रूपयात) |
|---|---|---|
| जुगार | १६ | १,०६,०४५ |
| दारूबंदी | ६३ | १,७५,३६० |
| वाळू | ०१ | ५,००० |

तसेच पोलीस स्टेशन हद्दीत अवैधरीत्या वाळू वाहतूक करणारे ३ वाहने ताब्यात घेऊन कन्नड तहसीलदार कार्यालयात जमा करण्यात आली असून त्यांच्याविरूध्द दंडात्मक कारवाई केली आहे.
(५) विलंब झालेला नाही.

---

## विदर्भातील अनुशेषाचा अभ्यास करण्यासाठी नेमण्यात आलेल्या दांडेकर समितीबाबत

**(४७) ६२१२८ (३०-०४-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने विदर्भातील अनुशेषाचा अभ्यास करण्यासाठी दांडेकर समिती नेमली असून या समितीने अहवाल १९८४ मध्ये सादर केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समितीचा अभ्यास अहवालानुसार त्यावेळी विदर्भाचा आर्थिक अनुषेष ३,१८६ कोटी रुपयांचा होता व तो राज्याच्या इतर विभागाच्या तुलनेत ३९ टक्के होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या समितीने अहवाल देऊन अनेक वर्षे उलटूनही विदर्भाचा अनुशेष कायम असून मागासलेपणा कायम असल्याने येथील जनतेत रोष व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निधीची तरतूद करुन विदर्भाचा अनुशेष भरुन काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (०७-०६-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे, विकासातील विभागीय असमतोलाचा शास्त्रशुध्द व सखोल अभ्यास करण्यासाठी डॉ. वि. म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधन समिती नेमली होती. सत्यशोधन समितीने एप्रिल, १९८४ मध्ये सादर केलेल्या अहवालात ९ विकास क्षेत्रात एकूण रु.३१८६.७८ कोटींचा अनुशेष दाखविला होता.

(२) हे खरे नाही, समितीचा अभ्यास अहवालानुसार त्यावेळी विदर्भाचा आर्थिक अनुशेष रु.१२४७ कोटी होता व तो राज्याच्या इतर विभागाच्या तुलनेत ३९ टक्के होता.

(३) व (४) हे खरे नाही, सन १९९४ रोजी निर्देशांक व अनुशेष समिती गठित करण्यात आली होती. दांडेकर समितीने दि. १ एप्रिल, १९८४ रोजी ज्या विकास क्षेत्रात अनुशेष काढला होता, त्या विकास क्षेत्रातील मार्च, १९९४ पर्यंतची प्रगती विचारात घेऊन निर्देशांक व अनुशेष समितीने विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र प्रदेशाचा अनुशेष निश्चित केला. त्यानुसार दि.३१.०३.१९९४ रोजी निश्चित केलेला व मा.राज्यपालांनी मान्य केलेला विदर्भाचा वित्तीय अनुशेष रु.६६२४.०२ कोटी इतका निर्धारित करण्यात आला. सन २००२-०३ पासून मा.राज्यपाल यांच्या निदेशांनुसार सदर अनुशेष निर्मुलनाची कार्यवाही करण्यात आली असून सद्यस्थितीत विदर्भाचा वित्तीय अनुशेष दूर झालेला आहे.

विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळे दि.३०.०४.२०२० रोजी संपुष्टात आली असली तरी मा.राज्यपाल यांनी विहित केलेल्या सुत्रानुसार विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र प्रदेशक्षेत्रात अनुक्रमे २६.२९%, १८.६८% व ५५.०३% या प्रमाणात विभाज्य निधीचे वाटप करण्यात येते.

विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळांचे पुर्नगठन करण्याचा दि.२७.०९.२०२२ च्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेतला असून त्याच्या अनुषंगाने मा.राज्यपालांच्या स्तरावरुन दि.२८.१०.२०२२ व दि.१२.१२.२०२२ च्या पत्रान्वये केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील पाणलोट शाखेतील कर्मचारी यांना इतर राज्याप्रमाणे कृषी विभागाअंतर्गत शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत

**(४८) ६२१५१ (२५-०४-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील पाणलोट शाखेत गत अनेक वर्षापासून कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना बिहार, दिल्ली, राजस्थान, उडिसा, पंजाब राज्याप्रमाणे शासकीय सेवेत समावून घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कर्मचारी

संघटना चंद्रपूर यांनी मा. जलसंपदा मंत्री यांना दिनांक २८ डिसेंबर, २०२१ तसेच दिनांक २४ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०२३) :**
(१) व (२) सदर निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तसेच अधीक्षक अभियंता, चंद्रपूर पाटबंधारे प्रकल्प मंडळ, चंद्रपूर मंडळांतर्गत गत वर्षापासून पाणलोट शाखेत एकही कंत्राटी कर्मचारी कार्यरत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### केज, (जि. बीड) तालुक्यातील ११ केव्ही फिडरवर लाईन कॅपीसीटर बँक बसविण्याबाबत

**(४९) ६२३१९ (२८-०४-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज, (जि. बीड) तालुक्यातील (एकूण- १४) ११ केव्ही फिडरवर लाईन कॅपीसीटर बँक बसवणेबाबतचे अंदाजपत्रके उपकार्यकारी अभियंता, महावितरण, केज. यांनी मंजुरी साठी कार्यकारी अभियंता, महावितरण, अंबाजोगाई यांचेकडे सादर केली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त (एकूण- १४) ११ केव्ही फिडरवर लाईन कॅपीसीटर बँक बसवणेबाबतच्या अंदाजपत्रकांना मंजुरी देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अधीक्षक अभियंता, महावितरण, बीड. यांचेकडे दिनांक ६ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
याबाबतचे मा. आमदार श्रीमती नमिता मुंदडा यांचे दि.०६.०२.२०२३ चे मुख्य अभियंता, लातूर यांना अग्रेषित केलेले निवेदन महावितरणच्या क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त आहे.
(३) ता. केज, जि. बीड मधील कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरील उपलब्ध निधीच्या आधीन राहून एकूण १४ अंदाजपत्रकापैकी रु. १३.६६ लक्ष एवढया रक्कमेची १२ अंदाजपत्रक मंजुर करण्यात आली आहेत. तसेच मंजूर १२ ठिकाणच्या लाईन कपॅसीटर बँक बसविण्यासाठी कार्यादेश देण्यात आले आहेत. मंजूर १२ ठिकाणांपैकी ६ ठिकाणची कामे पुर्ण करण्यात आली असून ६ ठिकाणची कामे प्रगतीपथावर आहेत. निधी प्राप्त होताच उर्वरित २ कामे प्राधान्याने पूर्ण करण्याबाबतचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गोगाव अडपल्ली उपसा सिंचन योजनेच्या पाईपलाईन द्वारे पाणीपुरवठा योजनेच्या वाढीव अंदाजपत्रकास मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(५०) ६२६३३ (२४-०४-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली तालुक्यातील गो जवळील वैनगंगा नदीवर भोगाव गोगाव उपसा सिंचन योजना कार्यान्वीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सध्या स्थितीत असणाऱ्या या योजनेचा लाभ फार अधिक शेतकऱ्यांना होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) त्यामुळे या योजनेच्या पाईपलाईन द्वारा पाणीपुरवठा करण्यासाठी ८.३७ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या योजनेला मंजुरी मिळाल्यास पूर्वीपेक्षा अधिक शेकडो हेक्टर शेतीला लाभ मिळण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने निर्णय घेऊन वाढीव अंदाजपत्रकास मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) नाही.
(३) नाही.
(४) सदर योजना पूर्ण झाली असून योजनेचे शेतीयोग्य क्षेत्र (CCA) ४०८ हे. व सिंचन योग्य क्षेत्र (ICA) ३७० हे. आहे. सदर योजनेद्वारे गोगाव व अडपल्ली या दोन

गावांना सिंचनाचा लाभ मिळत आहे. सदर योजनेच्या लाभक्षेत्रातील ८५.७० हे. जमीन गोंडवाना विदयापीठाच्या बांधकामाकरीता अधिग्रहण करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. तसेच नवीन ब्रॉडगेज रेल्वे लाईन लाभक्षेत्रातून छेदून जात असल्याने ५.११ हे. क्षेत्र कमी होत आहे. गोडवाना विदयापीठ व नवीन ब्रॉडगेज रेल्वे लाईनचे अंतिम सर्व्हेक्षण झाल्यानंतर योजनेचे लाभक्षेत्र किती कमी होणार आहे याचा अंदाज येईल. या योजनेची वितरण प्रणाली पारंपारिक उघडया कालवा (Open Canal) पध्दतीची असून त्याप्रमाणे भूसंपादन झालेले आहे.

शासन परिपत्रक क्र. सिंचन-२०१५/प्र.क्र.२४/(भाग-२)/२०१५ जसं (धोरण) दि. ०२.०२.२०१७ मधील मुद्दा क्र. ४ अन्वये "भूसंपादनाचा खर्च धरुन नलिका वितरण व्यवस्था पारंपारिक कालवा वितरणापेक्षा अधिक खर्चिक ठरते.त्यामुळे ज्या प्रकरणी पारंपारिक वितरण प्रणाली गृहीत धरुन भूसंपादन झाले आहे, अशा ठिकाणी नलिका वितरण प्रणालीचा विचार करु नये" असे स्पष्ट निर्देश देण्यात आले असल्याने सदय:स्थितीत गोगाव उपसा सिंचन योजनेकरीता पाईप लाईनद्वारे सिंचन करणे नियोजित नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**नागपूर.** **सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.